सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑वर्ष - ३ रे ❑अंक - २९३ वा❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु.❑पृष्ठ -६

## भाजपनं केरळमध्ये रचला इतिहास पहिल्यांदाच पक्षाचा महापौर विराजमान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ तिरुवनंतपुरम**

दक्षिणेकडील राज्य असलेल्या केरळमध्ये भाजपनं इतिहास रचला आहे. पहिल्यांदाच केरळमधील एखाद्या महापालिकेत भाजपची सत्ता आली असून, पक्षाचा महापौर विराजमान झाला आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते व्ही. व्ही. राजेश यांची केरळची राजधानी तिरुवनंतपुरम महापालिकेच्या महापौरपदी निवड झाली आहे. दक्षिणेकडील राज्याच्या राजकारणातील ही ऐतिहासिक घटना मानली जात आहे.

केरळच्या राजकीय इतिहासात भाजप अद्याप कधीच एखाद्या महापालिकेवर सत्तेत बसला नव्हता.



महापौरपदी विराजमान झाल्यानंतर व्ही. व्ही. राजेश यांनी सर्वांना सोबत घेऊन पुढे जाऊ, अशी प्रतिक्रिया दिली आहे. सर्वच्या सर्व १०१ वॉर्डांमध्ये विकासाची कामं केली जातील. तिरुवनंतपुरम विकसित शहर म्हणून ओळखला जाईल, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी शुक्रवारी सकाळी महापौर निवड झाली. यात ४५ वर्षीय राजेश यांना एकूण ५१ मते मिळाली. त्यांना अपक्ष नगरसेवक एम राधाकृष्णन यांनीही पाठिंबा दर्शवला. तर एका अपक्ष नगरसेवकानं मत दिलं नाही. १०० सदस्यसंख्या असलेल्या सभागृहात राजेश यांच्या बाजूने ५१ मते पडली. त्यांच्याविरोधात सीपीआयएमच्या आरपी शिवाजी यांना २९, तर काँग्रेसच्या नेतृत्वात यूडीएफच्या केएस सबरिनाथन यांना एकूण १९ मते मिळाली. भाजपने डिसेंबरच्या सुरुवातीला झालेल्या तिरुवनंतपुरम पालिकेच्या निवडणुकीत ५० जागा जिंकल्या होत्या.

विशेष म्हणजे मागील ४५ वर्षे तिरुवनंतपुरम पालिकेवर माकपची सत्ता होती. भाजपनं यावेळी झालेल्या निवडणुकीत सुरूंग लावला आणि दक्षिणेकडच्या राज्यात भाजपची पकड निर्माण होत असल्याचे दाखवून दिले. शपथविधी सोहळ्यानंतर केरळचे भाजप प्रदेशाध्यक्ष राजीव चंद्रशेखर यांनी सांगितले की, माकप आणि काँग्रेसने शहराला मागे ढकललं होतं. पालिका हा भ्रष्टाचाराचा अड्डा झाला होता. गेल्या काही वर्षांत सांडपाणी, पिण्याचे पाणी आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष दिले गेलेले नाही.

आजपासून आमचं काम सुरू होणार आहे. तिरुवनंतपुरम शहराला देशातील आघाडीच्या तीन शहरांमध्ये स्थान मिळवून देणं हे आमचं लक्ष्य आहे. राज्यात आगामी काही महिन्यांत निवडणुका होणार आहेत, त्या पार्श्वभूमीवर केरळमध्ये या माध्यमातून एक नवं पर्व सुरू झालं आहे, असं भाजपचं म्हणणं आहे.

## ना जागावाटप, ना उमेदवार नुसत्याच चर्चा, जोरबैठका

### कन्फ्युजनही कन्फ्युजन, सोल्यूशनचा पत्ताच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

महायुतीमध्ये जागावाटपाचा तिढा सुटण्याची चिन्हे सध्या तरी दिसत नाहीत. शहरातील हॉटेल ग्रॅण्ड मैफिल येथे आज महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीस शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री संजय राठोड, माजी आमदार अभिजीत अडसूळ आणि शिवसेना नेत्या प्रीती बंड उपस्थित होते. भाजपकडून माजी मंत्री प्रवीण पोटे व शहराध्यक्ष नितीन धांडे यांच्यासह अनेक नेत्यांनी बैठकीला हजेरी लावली.त्यामुळेकन्फ्युजनही कन्फ्युजन, सोल्यूशनचा पत्ताच नाही! अशी म्हणायची वेळ दोन्ही गटातील उमेदवारांवर आली



आहे.शिवसेना शिंदे गटाकडून महायुतीत २० ते २५ जागांचा प्रस्ताव दिल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. मात्र, भाजपच्या कोअर कमिटीबरोबर झालेल्या चर्चेत अद्याप अंतिम तोडगा निघालेला नाही. यापूर्वी नागपुरात जागा वाटपावर बैठक झाली होती. आता अमरावतीतही सलग चर्चेची मालिका सुरू असली तरी निर्णय पुढे ढकलला जात असल्याचे चित्र आहे.जागावाटपावरून महायुतीत मतभेद वाढत असल्याची राजकीय कुजबुज सुरू असून, युती फिस्कटण्याची शक्यता काही राजकीय वर्तुळांतून व्यक्त केली जात आहे. तरीही अधिकृत पातळीवर कोणतीही घोषणा झालेली नाही. सर्वांच्या नजरा आता महायुतीच्या अंतिम निर्णयाकडे लागल्या आहेत.

## मंत्री भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले २४ दिवसांपासून फरार; अटकपूर्व जामीनही फेटाळला; महाड हिंसाचार प्रकरण तापलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

महाड नगरपरिषद निवडणुकीदरम्यान झालेल्या मारहाण प्रकरणात राज्याचे मंत्री भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले यांना मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात विकास गोगावले यांनी दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला असून, त्यामुळे त्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. मतदानाच्या दिवशी घडलेल्या हिंसाचारामुळे आधीच राजकीय वातावरण तापलेले असताना, आता न्यायालयाच्या या निर्णयामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात




खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही दोन वेगवेगळ्या न्यायालयांनी विकास गोगावले यांना दिलासा देण्यास नकार दिला होता.

महाड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान सुरू असताना प्रभाग क्रमांक २ मध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. याच दरम्यान शिंदे गटाचे पदाधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या मारहाणीत राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप विकास गोगावले आणि त्यांच्या समर्थकांवर करण्यात आला आहे. या घटनेनंतर महाड पोलिस ठाण्यात विकास गोगावले यांच्यासह एकूण २९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र गुन्हा दाखल होताच सर्व आरोपी भूमिगत झाले आणि आजपर्यंत ते पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत.

या प्रकरणात विकास गोगावले यांनी अटक टाळण्यासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. माणगाव न्यायालयात त्यांनी दोन वेळा अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला, मात्र दोन्ही वेळा न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळला. त्यानंतर त्यांनी मुंबई न्यायालयातही धाव घेतली, परंतु तिथेही त्यांना दिलासा मिळाला नाही. सलग तिसऱ्यांदा जामीन नाकारण्यात आल्याने विकास गोगावले यांच्यावर अटकेची टांगती तलवार कायम आहे. गेल्या २४ दिवसांपासून ते फरार असल्याची माहिती असून, पोलिसांकडून त्यांचा कसून शोध सुरू आहे. याच प्रकरणातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी नाना जगताप हे देखील अद्याप फरार असल्याचं समोर आलं आहे.

या संपूर्ण प्रकरणामागे राजकीय वर्चस्वाची लढाई असल्याची चर्चा रंगली आहे. महाड नगरपालिका निवडणुकीदरम्यान विकास गोगावले आणि सुशांत जाबरे समर्थकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संघर्ष झाला होता. या राड्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात परस्पर तक्रारी दाखल करण्यात आल्या. मात्र न्यायालयाने आरोपींच्या अटकपूर्व जामीन अर्जांना नकार दिल्यानंतर, संबंधित सर्व आरोपी भूमिगत झाल्याचं चित्र आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनावरही आरोपींना अटक करण्याचं मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

## अमरावती महापालिका निवडणूक
## आज ५६८ नामांकन अर्जाची उचल तर पाच उमेदवारांचे ८ अर्ज दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

महानगरपालिकेच्या ८७ जागेसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यापूर्वीची निवडणूक प्रक्रिया २३ डिसेंबरपासून नामांकन अर्ज उचल व दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या निवडणुकीत ६ लाख ७७ हजार १८० मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहे. एकूण ७९७ मतदान केंद्र गठीत करण्यात आले आहे. महापालिका निवडणुकीकरीता ७ निवडणूक निर्णय अधिकार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे ७ ठिकाणी वेगवेगळे कार्यालये आहेत. आज एकूण ५६८ उमेदवार अर्जाची उचल करण्यात आली तर पाच उमेदवारांनी ८ अर्ज दाखल केले आहेत.

झोन क्रमांक १ - ७२, झोन क्रमांक २ - ७०, झोन क्रमांक ३ - ९६, झोन क्रमांक ४ - ७१, झोन क्रमांक ५ - ११८, झोन क्रमांक ६ - ५७, झोन क्रमांक ७ - ८४

## देवेंद्र फडणवीसांची राशीद मामू यांच्या पक्ष प्रवेशावरून उद्धव ठाकरेंवर टीका

### म्हणाले, विशिष्ट लोकांचे जोडे चाटायचे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

राज्यात आगमी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. निवडणुकीत संधी मिळवण्यासाठी नेते एका पक्षातून दुसरीकडे जात आहेत. यादरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे माजी महापौर रशीद मामू यांना शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात प्रवेश देण्यात आल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. या प्रकरणात आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी फडणवीसांनी उद्धव ठाकरे यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली आहे.

मामू यांना शिवसेना (ठाकरे) पक्षात मिळालेल्या पक्ष प्रवेशाबद्दल बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मला अतिशय दुःख आहे, की हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या सुपुत्राने अशाप्रकारे मतांचे लांगूलचालन करण्यासाठी अशा व्यक्तीला प्रवेश दिला आहे. यातून त्यांचे चरित्र आणि त्यांची दिशा स्पष्ट होत आहे. त्यांना आता लांगूलचालन करायचे आहे. विशिष्ट लोकांचे जोडे चाटायचे आहेत आणि त्यातून मते मिळवायची आहेत.

छत्रपती संभाजीनगरचे काँग्रेसचे माजी महापौर रशीद मामू यांनी काही दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत मुंबईतील मातोश्री या ठाकरेंच्या निवासस्थानी हा पक्षप्रवेश पार पडला.

या पक्ष प्रवेशावर ठाकरे गटाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आक्षेप घेतला आहे. समान नागरी कायद्यासाठी पहिला मोर्चा काढणाऱ्या शिवसेना नेत्यांवर दगडफेक करुन दंगल घडवून आणणाऱ्या व्यक्तीस पक्ष प्रवेश देणेच चूक होते; पण आता त्यांना उमेदवारी मिळू नये यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खैरे यांनी म्हटले आहे. याआधी रशीद मामू यांच्या पक्षप्रवेशावरून पालकमंत्री संजय शिरसाट यांनी ठाकरे गटावर 'उबाठा मामू' पक्ष अशी केली होती. अंबादास दानवे यांनी आपणास न विचारता हा पक्षप्रवेश घडवून आणल्याचा आरोपही खैरे यांनी केला होता.

## भाजप १४०, शिवसेना ८७, मुंबईसाठी महायुतीचा फॉर्म्युला जवळपास ठरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून भाजप आणि शिवसेनेत जागावाटपासाठी चर्चेच्या फेऱ्या सुरु आहेत. या चर्चेअंती आता भाजप आणि शिंदे सेनेच्या मुंबईतील जागावाटपाचा नवा फॉर्म्युला समोर आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मुंबई महापालिका निवडणूक २०२६ साठी महायुतीचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. त्यानुसार मुंबई महापालिकेच्या २२७ जागांपैकी भाजप १४० आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना ८७ जागा लढवणार असल्याची माहिती मिळत आहे. या महापालिकेमध्ये महायुतीतील अजित पवारांची राष्ट्रवादी स्वतंत्र लढणार आहे. त्यामुळे भाजप आणि शिवसेना मिळून २२७ जागा लढवणार आहेत. याबाबतची अधिकृत घोषणा आता कधी होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.




यापूर्वी जागावाटपाच्या पहिल्या बैठकीत भाजपने मुंबईत शिंदे गटासाठी फक्त ५२ जागा सोडण्याची तयारी दाखवली होती. मात्र, ठाकरे बंधूंच्या युतीनंतर भाजपने आता शिवसेनेला जास्त जागा देऊ केल्या होत्या. परंतु, जागावाटपच्या या सूत्रावर अधिकृतरित्या शिक्कामोर्तब कधी होणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपकडून अद्याप एकही उमेदवार जाहीर करण्यात आलेला नाही. बंडखोरी टाळण्यासाठी भाजपकडून वेट ंड वॉच धोरण अवलंबण्यात आल्याची चर्चा आहे. ठाणे, मुंबई, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, मिरा भाईंदर, पनवेलमधील जागावाटपाचा पेच कायम आहे. उद्यापर्यंत या सर्व ठिकाणचे जागावाटप पूर्ण होईल, अशी माहिती भाजपमधील सूत्रांनी दिली आहे.



संपादकीय ......

# राजकारणातील पिढीत होतोय बदल

*महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निकालाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या राजकारणातील पिढीत बदल होत असल्याचा स्पष्ट संकेत मिळाला आहे. महाराष्ट्रातील नगरपालिका आणि नगरपंचायतींमध्ये निवडून आलेल्या २८८ नगराध्यक्षांपैकी अर्ध्याहून अधिक मंडळी तरुण आहेत. काही राजकारणासाठी अगदी नवखे आहेत, काहींना घराण्याची पृष्ठभूमी आहे. काही पूर्णपणे स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहिलेले आहेत. पण या सर्वांमध्ये एक गोष्ट समान आहे आणि ती अशी की, लोकांनी या साऱ्यांना थेट निवडून दिले आहे. याचा अर्थ असा की, ते नगरसेवकांचे बहुमत वगैरे कल्पनेच्या पल्याड मतदारांच्या आवडीचे ठरले आहेत. अशी संधी राजकारणात फार कमी लोकांना मिळते. मात्र, अशा संधी ज्याप्रमाणे अनेकांचे भविष्य घडवितात, तशा त्या अनेकानेक अपेक्षाही व्यक्त करतात. त्या अपेक्षा समजून घेऊन या नव्या नगराध्यक्षांनी आता आपापल्या नगरांसाठी झोकून दिले पाहिजे.*

*नवनिर्वाचित नगराध्यक्ष महोदयांनी लक्षात घेण्यासारखी सर्वांत महत्त्वाची बाब अशी की, निकाल लागल्यानंतर नगराध्यक्ष हा कुठल्याही पक्षाचा राहत नाही; तो साऱ्या नगराचा होतो. प्रत्येक नागरिकाचा त्याच्यावर अधिकार असतो. रस्ता खराब झाला तर एका पक्षाचा विषय नसतो. नळाला पाणी नसेल तर तो दुसऱ्या पक्षाचा प्रश्न नसतो. दवाखान्यात औषध नसेल तर ती अमक्या पक्षाची चूक नसते. ते सारे नगराचे असते आणि नगराचा अध्यक्ष किंवा पालक म्हणून नगराध्यक्षांची जबाबदारी सर्वांत मोठी असते. नगरपालिका आणि नगरपंचायतींचा परिसर हा ना पूर्णपणे शहरी असतो, ना पारंपरिक गावासारखा. तो निमशहरी असतो आणि म्हणूनच तिथल्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या असतात. शेतीवर अवलंबून असलेली लोकसंख्या अधिक असते, पण शहरासारख्या सुविधा अपेक्षित असतात. आरोग्य, शिक्षण, पाण्याच्या सोयीचे प्रश्न कायम असतात, पण आकांक्षा मोठ्या असतात. अशा भागाचे नेतृत्व करताना नगराध्यक्षाने गावकीची संवेदनशीलता आणि शहरांचा व्यावसायिक दृष्टिकोन या दोहोंचा अंगीकार केला पाहिजे. याशिवाय, पक्षातीत काम करणे ही नगराध्यक्षांसाठी खरी कसोटी असते. काही ठिकाणी नगराध्यक्ष एका पक्षाचा आणि बहुमतात दुसरा पक्ष असेही घडले आहे. काहीही असले तरी नगरसेवक देखील शहराचे सेवक आहेत, ही बाब नगराध्यक्षांना त्या साऱ्यांच्या मनावर बिंबवावी लागेल. स्वपक्षाखेरीज विरोधी पक्षांतील नगरसेवकांशी संवाद ठेवणे, निधी वाटपात भेदभाव टाळणे, निर्णयप्रक्रियेत सर्वांना सामील करून घेणे हे सारे जमले तर नगराध्यक्ष हा नेता ठरेल अन्यथा तो राजकीय प्रक्रियेतून निवडून आलेला पदाधिकारी ठरेल. एखाद्या पक्षाचा शहराध्यक्ष आणि पालिका किंवा पंचायतीचा अध्यक्ष यातील फरक स्पष्ट होईल तो अशा भूमिकेतून.*

*आरोग्य आणि शिक्षण हे निमशहरी भागात कायम दुर्लक्षित राहिलेले विषय आहेत. नगरपालिकांचे दवाखाने आणि शाळा हा अत्यंत काळजीचा विषय आहे. शिक्षण आणि आरोग्याच्या उत्तम सोयी ही नगरांसाठी लक्झरी नव्हे; ती त्या भागाची मूलभूत गरज आहे, हे नगराध्यक्षांनी ओळखले पाहिजे. आरोग्य आणि शिक्षणावर काम करणारा नगराध्यक्ष पुढील किमान अर्धशतकाचा समाज घडवत असतो, हे लक्षात ठेवले पाहिजे. याला जोडूनच पाणीपुरवठा आणि स्वच्छता या विषयांचा विचार केला पाहिजे. हे काम अत्यंत कंटाळवाणे, तांत्रिक आणि सातत्याने लक्ष द्यावे लागणारे आहे. या कामांत शिस्त, निरीक्षण आणि व्यवस्थापन लागते. याच विषयांत अनेक नगराध्यक्ष अपयशी ठरतात. त्यामुळे नव्या नगराध्यक्षांनी या विषयांचा अभ्यास करून काम करणे अपेक्षित आहे. निमशहरी भागात सामाजिक सद्भाव राखणे हेही मोठे आव्हान आहे. जाती, धर्म, आर्थिक स्तर यांचा संगम इथे असतो. एक चुकीचा शब्द किंवा एक पक्षपाती निर्णय मोठा तणाव निर्माण करू शकतो. अशा वेळी नगराध्यक्षाला समन्वयाची भूमिका घ्यावी लागते. सामाजिक सद्भाव राखणारा नगराध्यक्ष सर्वांच्या आदराला पात्र ठरतो. सुरक्षित सार्वजनिक ठिकाणे, स्वच्छ शौचालये, खेळाची मैदाने, उद्याने, विरंगुळ्याची ठिकाणे, शहरातील सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम हे सारे विषय असतात. भ्रष्टाचार हा तर आपल्या साऱ्या व्यवस्थांच्या सर्व स्तरांना पुरून उरलेला विषय आहे. कोणतेही परिवर्तन, मग ते भौतिक असो वा नसो, सिस्टेमिक बदलातून होत असते. व्यवस्था बदलायची म्हटली की व्यवहार आला. व्यवहार असेल तेथे खर्च आला. खर्च असेल तेथे टेंडरिंग आले. टेंडर आले की कंत्राटदार आणि दलालांचा वावर असणार.ींपिळलळरिश्रि र्लेीपलळश्र शश्रशलींळेपी हे सारे नगराध्यक्षाला हाताळावे लागणार आणि त्या गुंताड्यातून मार्ग काढावा लागणार. नगराध्यक्षांचे काम बोलले पाहिजे. सोशल मीडियाची टीम मागे ठेवून स्लोमो व्हिडीओजमधून चमकणे फार कठीण नाही. काम करणे कठीण आहे. त्यातही चांगले, पारदर्शी, दर्जेदार आणि लोकांना पटेल असे काम करणे अतिशय कठीण आहे. कारण आपल्या राजकारणाची व समाजकारणाची ढब अशी आहे की, सत्तेभोवती मुंगळे जमतात. सत्तापदी बसलेल्या व्यक्तीला योग्य काम करायचे असले, तरी हे मुंगळे तिला ते करू देतीलच असे नाही. त्या दृष्टीने नगराध्यक्षांना सावध राहावे लागणार आहे. सत्ता डोक्यात जाऊ न देणे कठीण आहे आणि आपल्याला हे पद निधिपती म्हणून नव्हे तर प्रतिनिधी म्हणून मिळाले आहे, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. आजचे नगराध्यक्ष हे उद्याचे आमदार, खासदार आणि मंत्री असू शकतात. पण, सर्वांना हे वास्तव लक्षात ठेवावे लागेल की, नगराध्यक्ष म्हणून तुमची कारकीर्द चांगली नसेल तर पुढच्या वाटा आपसूक बंद होतील. स्थानिक स्वराज्य संस्थेत अपयशी ठरलेला नेता मोठ्या व्यासपीठावरही अपयशीच ठरतो. याउलट ग्रामपंचायतीपासून सुरू केलेली कर्तबगारी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर घेऊन गेल्याचीही उदाहरणे आहेत. हे सारे लक्षात ठेवून सर्व नव्या नगराध्यक्षांनी पहिल्या शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम निश्चित केला पाहिजे आणि त्याच्या अंमलबजावणीचा आराखडाही तयार केला पाहिजे. हा कार्यक्रम निश्चित करण्यापूर्वी अभ्यास केला पाहिजे. आकडेवारी पाहिली पाहिजे. पदग्रहण झाल्याबरोबर कृती कार्यक्रम घोषित झालाच पाहिजे, असे नव्हे. प्रशासनासोबत बसून शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, सांडपाणी, कचऱ्यांची विल्हेवाट, रस्ते, चौक, वाहतूक, बाजार, पर्यावरण, डिजिटल सर्व्हिसेस अशा सर्व विषयांची समज पक्की करून आणि प्रत्यक्ष पाहणी करून मगच बोलले पाहिजे. तातडीने करावयाची कामे, अल्पकालीन कामे आणि दीर्घकालीन कामे असे विभाजन केले पाहिजे. त्यासाठी उपलब्ध साधनसामग्री व निधी यांचा अंदाज घेतला पाहिजे. पोकळ आश्वासने जन्मभर पाठलाग करीत असतात. पदाच्या नादात घोषणाबाजी करण्याचा सोस टाळला पाहिजे. सर्वांत महत्त्वाचे आहे ते संवादी असणे. अधिकाऱ्यांशी बोला. कंत्राटदारांशी बोला.ींपिळलळरिश्रि र्लेीपलळश्र शश्रशलींळेपी पण, जनतेला तुमच्यापर्यंत थेट पोहोचता येईल, अशी व्यवस्था निर्माण करा. तुम्हाला ज्यांनी थेट निवडून दिले आहे, ते कधीही तुम्हाला थेट जमिनीवर पण आणू शकतात हे लक्षात ठेवा... तुमची पहिली जबाबदारी नगराप्रति म्हणजे नगरातील जनतेप्रति आहे, हे कधीही विसरू नका, नगराध्यक्ष महोदयांनो!*

# अमरावतीमध्ये आतापर्यंतचा सर्वात मोठा मेगा पब्लिक हार्ट हेल्थ जनजागृती कार्यक्रम

## प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. नीरज राघानी करणार मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती** – वेगाने वाढत असलेले हृदयविकाराच्या झटक्यांचे प्रमाण आणि लहान मुलांमध्ये वाढत असलेल्या घटना लक्षात घेता, दुर्गा प्रकाश ट्रस्ट आणि झेनिथ हॉस्पिटल, अमरावती संयुक्तपणे मेगा पब्लिक हार्ट हेल्थ जनजागृती आणि मार्गदर्शन – २०२५ या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करत आहेत. हा कार्यक्रम रविवार, २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पंजाबराव देशमुख मेमोरियल मेडिकल कॉलेज (पीडीएम एमसी),



पंचवटी चौक, नागपूर रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात, पश्चिम विदर्भातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. नीरज राघानी, हृदयविकाराच्या झटक्यापूर्वी शरीराला कोणते संकेत मिळतात, हृदयविकाराचा झटका आणि गॅसच्या वेदनांमध्ये काय फरक आणि जीव वाचवण्यासाठी हृदयविकाराच्या झटक्यानंतर पहिल्या १० मिनिटांत कोणती पावले उचलता येतील याबद्दल जनतेला साधी माहिती देतील. या प्रसंगी पोषणतज्ञ डॉ. काजल केसवानी दैनंदिन जीवनात निरोगी खाणे, प्रथिनांचे योग्य प्रमाण आणि आतडे आणि मानसिक आरोग्य यावर मार्गदर्शन करतील. डॉ. रोमा बजाज, एमडी, पीएचडी, निसर्गोपचाराद्वारे हृदयाशी मैत्री या विषयावर विशेष माहिती देतील. डॉ. दिशा सोनी फिजिओथेरपीची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करतील.

# रब्बी हंगामात लसणाच्या 'या' तीन जातींची लागवड करा, होईल लाखो रुपयांची कमाई

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक**

लसूण हे एक नगदी पीक आहे, ज्याला वर्षभर मागणी असते, म्हणूनच शेतकरी त्याला पांढरे सोने म्हणतात. देशभरातील अनेक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते.




लसूण दीर्घकाळ टिकतो, ज्यामुळे शेतकरी ते कधीही, त्यांच्या सोयीनुसार विकू शकतात, चांगला नफा मिळवू शकतात. जर तुम्ही या रब्बी हंगामात लसणाची लागवड करण्याचा विचार करत असाल, तर या तीन जाती अधिक फायदेशीर ठरतील.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

यमुना सफेद-३ (जी-२८२)

यमुना सफेद-३ (जी-२८२) ही उच्च दर्जाची लसणाची जात आहे. या वाणाला देशभरात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. तिचा मोठा आकार, पांढरी साल आणि मजबूत कंद हे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

प्रत्येक कंदात अंदाजे १५-१६ पाकळ्या असतात, ज्यामुळे ती बाजारपेठेतील इतर जातींपेक्षा वेगळी ठरते. ही जात व्यापारी आणि ग्राहक दोघांनाही खूप आवडते, ज्यामुळे शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळते.

वैशिष्ट्ये

या जातीपासून शेतकरी प्रति हेक्टर १७५-२०० क्विंटल पीक घेऊ शकतात.

ही जात १२०-१४० दिवसांत परिपक्व होते.

ही जात मध्य प्रदेश, महाराष्ट्र, हरियाणा, पंजाब, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि छत्तीसगडमधील शेतकऱ्यांसाठी अत्यंत योग्य आहे.

ॲग्रीफाउंड पार्वती (ऋ-३१३)

भारतात लसणाची मागणी वर्षभर स्थिर राहते – औषधी उद्देशांसाठी, मसाल्यांसाठी आणि अन्न प्रक्रिया उद्योगासाठी त्याचा वापर सतत वाढत आहे. या परिस्थितीत ॲग्रीफाउंड पार्वती शेतकऱ्यांसाठी एक उत्तम पर्याय आहे. त्याचा गुलाबी रंग आणि प्रत्येक कंदात १०-१६ मोठ्या पाकळ्या असतात.

वैशिष्ट्ये

शेतकरी २३०-२५० दिवसांत या जातीची कापणी करू शकतात.

जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील शेतकऱ्यांसाठी ही जात अत्यंत योग्य आहे.

शेतकरी प्रति हेक्टर २००-२२५ क्विंटल उत्पादन मिळवू शकतात.

**ऊटी लसूण-** लसूण दीर्घकाळ टिकतो, ज्यामुळे शेतकरी ते कधीही, त्यांच्या सोयीनुसार विकू शकतात, चांगला नफा मिळवू शकतात.

ऊटी लसूण हा बाजारात एक उत्तम प्रकार मानला जातो कारण त्याचे कंद मोठे असतात आणि ते सोलण्यास सोपे असतात. म्हणूनच ग्राहक आणि व्यापारी विशेषतः या जातीला प्राधान्य देतात. ही जात शेतकऱ्यांना चांगले उत्पादन आणि चांगले बाजारभाव दोन्ही देते.

वैशिष्ट्ये

त्याचे कंद स्थानिक लसणाच्या दुप्पट आकाराचे असतात.

ही जात शेतकऱ्यांना १२०-१४० दिवसांत चांगले उत्पादन देते.

ही जात प्रामुख्याने मध्य प्रदेश, राजस्थान आणि गुजरातमध्ये लागवड केली जाते.

मालवा आणि राजस्थान प्रदेशात लसूण उत्पादनात ही जात ८०-९०टक्के योगदान देते.

# आवळा जास्त फायदेशीर आहे की लिंबू? वाचा सविस्तर

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

आवळा आणि लिंबू दोन्हीमध्ये व्हिटॅमिन सीसह अनेक पोषक घटक मोठ्या प्रमाणात असतात. व्हिटॅमिन सी बद्दल बोलायचे झाले तर, आवळ्यामध्ये लिंबूपेक्षा जास्त व्हिटॅमिन सी असते. प्रथम आवळ्याचे काही आरोग्य फायदे






आणि लिंबूचे काही आरोग्य फायदे समजावून घेऊया. हा लेख वाचल्यानंतर, तुमच्यासाठी कोणते जास्त फायदेशीर आहे हे तुम्हाला समजेल:

**आवळ्याचे फायदे:**

आवळा खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होऊ शकते. मधुमेहासारख्या मूक किलर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठीही आवळा खूप फायदेशीर ठरू शकतो. आवळ्यामध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म देखील मोठ्या प्रमाणात असतात. आवळा तुमच्या आहार योजनेत योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने समाविष्ट करा आणि तुमचे आरोग्य मजबूत करा.

**लाभकारी लिंबू –**

लिंबूमधील असंख्य पोषक घटक पचन आणि आतड्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकतात. शरीराला विषमुक्त करण्यासाठी लिंबू तुमच्या आहार योजनेत देखील समाविष्ट केले जाऊ शकते. शरीरातील चयापचय वाढवण्यासाठी लिंबू पाणी पिऊ शकता.

**कोणते चांगले आहे –**

तुम्हालाही प्रश्न पडतोय का की या दोघांपैकी कोणता जास्त फायदेशीर आहे? जर असेल तर तुमच्या गरजांनुसार, तुमच्या आरोग्यासाठी कोणता पर्याय चांगला ठरू शकतो. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आवळा सेवन करता येतो. पण जर तुम्हाला पचन सुधारायचे असेल किंवा वजन कमी करायचे असेल तर तुम्ही आवळा आणि लिंबू दोन्ही योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने सेवन करायला सुरुवात करावी.

# डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालयाला एन.ए.बी.एच. मुल्यांकन प्रमाणपत्र प्राप्त




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती :-** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मोर्शी रोड, अमरावतीला वैद्यकीय क्षेत्रातील एन.ए.बी.एच. मुल्यांकन संस्था, नवी दिल्ली यांचेकडून एनएबीएच प्री एन्ट्री लेव्हल मुल्यांकन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. सदर प्रमाणपत्र मिळणे महाविद्यालय व रुग्णालयासाठी अतिशय आनंदाची व महत्वाची बाब आहे. कारण हे प्रमाणपत्र अशा वैद्यकीय संस्थाना दिले जाते ज्यांच्याकडे औषधोपचाराच्या सर्व सोयी-सुविधा उत्तम दर्जाच्या असतात. सदर प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याकरीता अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, वैद्यकीय उपअधिक्षक डॉ. सोमेश्वर निर्मळ, रूग्णालय व्यवस्थापक डॉ. श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख तसेच लिपीक किशोर इंगोले, अर्पित वानखडे, शंतनू वानखडे यांनी अथक परिश्रम घेऊन या कार्यास आपले मोलाचे योगदान दिले आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी प्र. देशमुख तसेच सन्माननीय पदाधिकारी व सदस्य यांनी एनएबीएच मुल्यांकन प्राप्त झाल्याबद्यल महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

# धर्माचरण, सद्विचार आणि परोपकार यातच खरे सुख दडलेले आहे

## शिवानंद महाराज शास्त्रीकाशिनाथ धाम येथे शिवमहापुराण कथेला भाविकांची मोठी गर्दी

### संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाला भक्तिभावात उत्स्फूर्त सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६नांदगाव पेठ**

आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात माणूस सुखाच्या शोधात भरकटत चालला आहे. मात्र खरे सुख हे संपत्ती, पद, प्रतिष्ठा किंवा प्रसिद्धीत नसून धर्माचरण, सद्विचार आणि परोपकार यातच दडलेले आहे, असे अत्यंत मोलाचे आणि प्रेरणादायी विचार ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले.परमहंस संत श्री काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित भव्य धार्मिक महोत्सवाला गुरुवारपासून मोठ्या भक्तीभावात प्रारंभ झाला असून, काशिनाथ धाम येथे सुरू असलेल्या शिवमहापुराण कथावाचनात ते बोलत होते.संत काशीनाथ महाराज संस्थान च्या वतीने पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाचे यंदाचे विसावे वर्ष असून, या निमित्ताने नांदगाव पेठ परिसर संपूर्णपणे भक्तीमय आणि आध्यात्मिक वातावरणाने न्हाऊन निघाला आहे. २५ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या महोत्सवात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.महोत्सवाच्या प्रारंभी सकाळी संत काशिनाथ महाराज मंदिरात विधीवत पूजा व आरती पार पडली. त्यानंतर संत काशिनाथ बाबा सामूहिक चरित्र ग्रंथ पारायण मोठ्या श्रद्धेने करण्यात आले. पुढे काशिनाथ धाम येथे यजमानांच्या हस्ते विधीपूर्वक पूजन करून पुण्यतिथी महोत्सवाची औपचारिक सुरुवात करण्यात आली.दुपारी भाविकांसाठी विशेष आकर्षण असलेले श्री शिवमहापुराण कथावाचन आयोजित करण्यात आले होते. यावेळी ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री यांनी आपल्या सुमधुर, ओघवत्या आणि प्रभावी वाणीने शिवमहापुराण कथेचे वाचन केले. कथावाचनातून त्यांनी भगवान शंकराचे महत्त्व, भक्तीचे सामर्थ्य आणि मानव जीवनातील नैतिक मूल्यांचे महत्त्व अत्यंत सोप्या शब्दांत विशद केले. यावेळी पुढे बोलताना शिवानंद महाराज शास्त्री म्हणाले,की, भगवंताच्या



कथांचे श्रवण केल्याने मन शुद्ध होते, विचार सकारात्मक बनतात आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. कथा ऐकणे म्हणजे केवळ परंपरा जपणे नव्हे, तर आपल्या जीवनात चांगल्या संस्कारांची रुजवणूक करणे होय.प्रत्येकाने आपल्या जीवनात सत्य, सेवा आणि समर्पण या मूल्यांचा अंगीकार केला, तर समाज नक्कीच सुदृढ, संस्कारक्षम आणि समृद्ध बनेल.संगीतमय कथावाचन, मधुर अभंग, श्लोक आणि नामघोष यामुळे काशिनाथ धाम परिसर हर हर महादेवच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. शिवमहापुराण कथा ऐकण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती, अनेक भक्तांनी या कथावाचनातून आत्मिक शांती व समाधान मिळाल्याची भावना व्यक्त केली. या पुण्यतिथी महोत्सवात श्री ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, हरीभजन, शिवमहापुराण कथा, हरिकीर्तन, सामूहिक प्रार्थना आदी विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असून, सप्ताहभर चालणारा हा महोत्सव भाविकांसाठी एक आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.संत काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित या भव्य महोत्सवामुळे नांदगाव पेठ परिसरात भक्ती, श्रद्धा आणि संस्कारांची ऊर्जा संचारली असून, भाविकांमध्ये अध्यात्मिक जागृती निर्माण होत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# विदर्भात आंबा लागवडीसाठी चांगले कृषी हवामान

## कुलगुरू डॉ.शरद गडाख आणि डॉ.विलास खर्चे यांचे आंबा लागवडीचे आवाहन

## 'शिवाजी'च्या आंबा परिषदेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती–** विदर्भात आंब्याचे क्षेत्र वाढायला भरपूर वाव असून केशर आंब्याला देशविदेशात मोठी मागणी आहे.एकात्मिक शेती पद्धतीत आंबा फार मोठे उत्पादन देऊ शकतो. विदर्भात आंबा लागवडीसाठी चांगले कृषी हवामान आहे त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांनी आंब्याची लागवड मोठ्या प्रमाणात करावी, असे आवाहन डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांनी केले.श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित आंबा परिषदेच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे हे होते.महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे सदस्य मोरेश्वर वानखडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजानन पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, सुरेशदादा खोटरे, प्रा.सुभाष बनसोड, संस्था सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, प्राचार्य डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ उदघाटन सोहळ्याला प्रामुख्याने उपस्थित होते.श्री शिवाजी शिक्षण संस्थेने राष्ट्रीय कृषी प्रदर्शनी नंतर दरवर्षी कृषी संबंधीचा जो उपक्रम हाती घेतला आहे तो अत्यंत स्तुत्य असून नुसती परिषद न घेता प्रत्यक्ष प्रात्यक्षिक ही संस्था परिसंवादाचे वेळी देते हे महत्त्वाचे असल्याचे सांगून डॉ.गडाख यांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.कुलगुरू डॉ.विलास खर्चेआपला देश कृषिप्रधान देश असून महाराष्ट्र हे कृषीच्या संदर्भात अग्रगण्य राज्य आहे आपल्या राज्याची हार्टीकल्चर राज्य म्हणून ओळख आहे, असे प्रमुख अतिथी कुलगुरू डॉ.विलास खर्चे म्हणाले.एकचएक पिक पद्धतीमुळे जमिनीचे आरोग्य खालावले असून हवामान बदलाचा देखील शेतीवर परिणाम होत आहे.त्यामुळे पिक बदल आवश्यक आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्था अगदी योग्यवेळी हा उपक्रम घेत असून ही अत्यंत अभिनंदनीय आहे, असेही खर्चे म्हणाले.मोरेश्वर वानखडे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.अध्यक्ष हर्षवर्धन देशमुखआज कृषिप्रधान देश आहे असे म्हणूनच आपण समाधान मानायचे का?असा सवाल करत कार्यक्रमाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी शेतीचे उत्पादन ६० टक्क्यावरून चार टक्क्यावर आल्याचे सांगितले.कृषीचे उत्पन्न वाढल्या शिवाय भारताचा जी.डी.पी वाढणार नाही, असेही ते म्हणाले.संस्था भाऊसाहेबांच्या शेतीच्या संदर्भातील विचारांना बांधील असून त्या दृष्टीने कार्य करीत आहे. आमच्या कृषी महाविद्यालयांनी कृषी क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग सुरु केले आहेत.पुढच्या वर्षी पुन्हा भव्य कृषी प्रदर्शनी घेण्याचा संस्थेचा मानस आहे,असेही त्यांनी सांगितले.या अतिसघन आंबा लागवड परिषदेच्या उदघाटन सोहळ्यात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे नवनियुक्त कुलगुरू डॉ.विलास खर्चे आणि डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांचा शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.परिषदेचे मुख्य संयोजक व श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रशेखर देशमुख यांनी प्रास्ताविक आणि पाहुण्यांचे स्वागत केले.उदघाटन सोहळ्याचे संचालन डॉ.राजेश मिरगे यांनी केले तर कृषी विद्याशाखा, रुरल इन्स्टिट्यूटचे प्राचार्य अभय ढोबळे यांनी आभार मानले.जे.डी.सांगळूद्कर महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्या चमूने डॉ.राजेश उमाळे व डॉ.सुरेंद्र होजे यांच्या नेतृत्त्वात स्वागतगीत व गौरवगीत सादर केले.श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाला आंबा परिषदेच्या आयोजनात शिवाजी कृषी महाविद्यालय, शिवाजी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी विद्याशाखा, रुरल इन्स्टिट्यूट आणि जनता कृषी विद्यालय यांचे सहकार्य लाभले.या परिषदेला विविध वक्त्यांनी मार्गदर्शन केले.सुमारे दोन हजार शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला.

# वाहत्या कॅनॉलमध्ये पत्नीला ढकलले

## पतीसह एक अल्पवयीनास अटक, पिंपळखुटा (मोठा) नजिकची घटना

### झाडामुळे वाचला जीव



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६तिवसा –** आत्याकडे जाण्यास निघालेल्या पत्नीला दुचाकीने सोडून देण्याची बतावणी करून तिला पतीने पाण्याने भरून वाहणाऱ्या कॅनॉलमध्ये ढकलले व तेथून पळ काढला. मात्र म्हणतात ना, की देव तारी, त्याला कोण मारी, नेमका असाच प्रत्यय या घटनेत आला. कॅनॉलच्या पाण्यातील एका झाडाचा आश्रय घेतल्याने त्या महिलेचे प्राण वाचले. तिवसा पोलिसांनी पती शिवा सवले(रा, करजगाव) याच्यासह एका १७वर्षीय मुलास अटक केली.तिवसा येथून १५ किलोमीटर अंतरावरील पिंपळखुटा मोठा नजीकच्या कॅनॉलजवळ ही घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, पती–पत्नी हे काही कारणास्तव विभक्त राहत होते, मात्र त्यांचा फोन वर संवाद सुरू राहायचा. अश्यातच २१ वर्षीय पत्नी ही आकोट येथे आत्याकडे जाण्यास निघाली. तिने पतीला याबाबत सांगितले, तेव्हा पती शिवा याने तिला मीच सोडून देतो, असे म्हणत तिला दुचाकीवर बसविले. एका १७ वर्षीय मुलासमुद्धा सोबत घेतले. तिघेही दुचाकीने सातरगाव मार्गे निघाले.पिंपळखुटा नजीकच्या कॅनॉलजवळ शिवाने गाडी थांबवून त्या मुलाचय मदतीने तिचे हात–पाय पकडून तिला कॅनॉलमध्ये फेकून तेथून पळ काढला. मात्र देव तारी, त्याला कोण मारी याप्रमाणे महिला कॅनॉलमध्ये पडताच काही अंतरावरच एक झाड तिच्या हाती लागले आणि तिचा जीव कसाबसा वाचला. कॅनॉलमधून बाहेर निघून ती एका शेतातील गृहस्थाकडे गेली. तिने हकीकत सांगितली व तिवसा पोलीस स्टेशन गाठून फिर्याद नोंदविली. पोलिसांनी तक्रारीवरून पती शिवासह त्या मुलास ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार गोपाल उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# संक्रांतीसमोर नायलॉन मांजावर संक्रांत

## पालकांना ५० हजार रुपये, दुकानदारास अडीच लाख दंड ?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६नागपूर,**




नायलॉन मांजामुळे नागरिकांच्या शरीरावर जखमा होत असून गळा चिरल्याच्याही अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे, नायलॉन मांजाला विरोध करत काहींनी न्यायालयात धाव घेतली आहे. आता, न्यायालयाने देखील ही बाब गंभीरतेने घेत नागरिकांच्या सूचना व हरकती मागवल्या आहेत. अन्यथा, नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्या मुलांच्या पालकांना आणि विक्री करणाऱ्यांना मोठ्या दंडाची शिक्षा सुनावली जाणार आहे. गृह विभागाने सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवले आहे. नायलॉन मांजाच्या वापरावर अंकुश ठेवण्यासाठी वेळोवेळी विविध आदेश पारित केले आहेत. मात्र, नायलॉन मांजाचासर्रास वापर अजूनही सुरू असल्याने उच्च न्यायालयाने यात आता दोषी आढळल्यास मोठ्या आर्थिक शिक्षेची प्रस्तावना ठेवली आहे. एखादा अल्पवयीन नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास पालकांना न्यायालयात ५० हजार दंड स्वरूपात जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत ? तर प्रौढ आढळल्यास त्यास ५० हजार रुपये दंड करण्याचे आदेश का देऊ नयेत? वएखाद्या विक्रेत्याकडे जर नायलॉन मांजाचा साठा आढळला तर त्याला अडीच लाख रुपये दंड का देऊ नये? अशा प्रस्तावित शिक्षेची सुनावणी ५ जानेवारी २०२६ रोजी उच्च न्यायालयाने निश्चित केली आहे.–

# नवनिर्वाचित नगरसेवकाला जीवे मारण्याच्या धमक्या

## अभिनंदन करणारे बॅनर फाडलं, सदर प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६चांदूर रेल्वे –** चांदूर रेल्वे नगर परिषदेच्या पार पडलेल्या निवडणुकीच्या निकालामध्ये हर्षल वाघ अपक्ष म्हणून विजय झाले. त्यांच्या सोबतच प्रा.प्रियंका विश्वकर्मा या नगराध्यक्ष म्हणून विजयी झाल्या म्हणून त्यांच्या समर्थकांनी व शुभचिंतकांनी चांदूर रेल्वे शहरात ठिकठिकाणी आपलं चांदूर रेल्वे पॅनलचे अभिनंदन करणारे बॅनर–फलक लावले. त्यापैकी चांदूर रेल्वे येथील सिनेमा चौक परिसरातील काही बॅनर लावले. ते बॅनर मंगळवारी रात्री (ता.२३) फाडण्यात आले. सदर प्रकार सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. तसेच नवनिर्वाचीत नगरसेवक हर्षल वाघ यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. हर्षल वाघ यांच्या लेखी तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी आरोपीविरूध्द एन.सी. गुन्हा दाखल केला आहे. चांदूर रेल्वे नगर परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाने हर्षल वाघ व त्यांच्या पत्नीला पक्षाची तिकिट दिली नाही. त्यामुळे त्यांनी नगरसेवकपदाकरीता प्रभाग क्र.४ मध्ये आपलं चांदूर पॅनेल ला साथ देत उमेदवारी अर्ज दाखल केला. हर्षल वाघ व आपलं चांदूर रेल्वे पॅनलच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार प्रा.प्रियंका विश्वकर्मा बहुमतांनी निवडून आले. त्यांचे समर्थक व शुभचिंतकांनी चांदूर रेल्वे शहरात ठिकठिकाणी आपलं चांदूर रेल्वे पॅनलचे अभिनंदन करणारे बॅनर–फलक लावले. त्यापैकी चांदूर रेल्वे येथील सिनेमा चौक परिसरातील काही बॅनर लावले होते. ते बॅनर मंगळवारी (ता.२३) रात्री त्यांच्या विरोधकानी फाडले. सदर प्रकार सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. बॅनर फाडणारा स्वरूप रोडे, रा.आझाद चौक अन्य काही



युवक मध्यरात्री त्यांचे बॅनर फाडून टाकत असतांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसले. या सर्व प्रकारामागे निवडणुकीमध्ये झालेला पराभव पचवू न शकलेले, तसेच प्रचारादरम्यान मर्डर करून टाकू,मारून टाकू, कापून टाकू, गाडीने उडवून देऊ अशी भाषा वापरणारे तसेच विजयी मिरवणूक सुरू असतांन शिवीगाळ तू आपलं चांदुर पॅनल यांचेकडून का लढला ? आता तुझं खरे नाही. तुझा त जीव घेतो,असे म्हणत विक्षिप्त हातवारे करणे. या सर्वांमागे विरोधकांचा डाव असण्याची दाट शक्यता आहे. या सर्व प्रकारामुळे शहरातील शांतता व सुव्यवस्थेचा भंग करण्याचा प्रयत्न आमच्या विरोधकांकडून होत असल्याचे दिसून येते. तसेच या सर्वांकडून माझ्या व माझ्या परिवाराच्या माझ्या सहकाऱ्यांच्या जीवाला धोका असल्याचे दिसून येत आहे. आमचे सोबत येत्या काळात कुठलाही उच्च नीच प्रकार घडल्यास अपघात, घातपात झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी माझे विरोधक व स्वरूप रोडे यांची सर्वस्वी राहील अशी लेखी तक्रार चांदूर रेल्वे पोलिस स्टेशनला हर्षल वाघ यांनी २४ डिसेंबर रोजी दिली. या प्रकरणात चांदूर रेल्वे पोलिसांनी एनसी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने मोठी अडचण २०-२५ एकरातील सोयाबीनची शेतातच गंजी


## शेतकरी आर्थिक संकटात, प्रशासनाकडे रस्त्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती**

शेताची वहिवाट करता यावी म्हणून पांदण रस्त्यांची निर्मिती केली गेली. कालांतराने पांदण रस्त्यांवर अतिक्रमण झाले. काही रस्ते नष्ट झालेतर काहींची आता दुरूस्तीहोत आहे. असे असले तरी अनेक शेतांपर्यंत पोहोचण्यासाठी मार्ग नसल्याने शेतकऱ्यांची अडचण होत आहे. मोर्शी तालुक्यातील मौजा विष्णोरा येथे असाच प्रकार होत असून काही वर्षांपूर्वी पाटबंधारे विभागामार्फत नाल्याचे खोलीकरण केल्याने शेतकऱ्यांच्या रस्त्याचे नुकसान झाले. त्यामुळे अजूनही अनेक शेतकऱ्यांची सोयाबीनचे ढिग शेतातच पडून आहे. अद्याप ते सोयाबीन काढतान आल्याने शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

मौजा विष्णोरा येथील राजेंद्र पुंडलिक ठाकरे, विलास वासुदेव ठाकरे, धनराज काशीराव ठाकरे शयाम केशव पांडे, गणेश चांदुरकर, नरेश शिरसाट आदी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात शेती आहे. खरीप हंगामात त्यांनी शेतात सोयाबीन आणि तुरीची पेरणी केली होती. यातील सोयाबीनची कापणी करण्यात आली असून ते ढीग लावून शेतात ठेवण्यात आले आहे. सोयबीन काढण्यासाठी थ्रेशर, हडंबा यासारखे यंत्रसाहित्य शेतात घेऊन जाणे गरजेचे असते; पण शेतात



जाण्याकरिता रस्ताच राहिला नसल्याने सोयाबीनची काढणी रखडली आहे. त्याचबरोबर काही शेतकऱ्यांची संत्रा झाडे असल्याने रस्त्यामुळे संत्राविकत घेण्याकरिता व्यापारीयेत नाही. त्यामुळेसंत्रापिक सुद्धा शेतातच गळून पडते आहे.

विष्णोरा येथील राजेंद्र ठाकरे यांच्या शेतापर्यंत काही वर्षांपूर्वी रस्ता होता परंतु पाटबंधारे विभागामार्फत त्या नाल्याचे खोलीकरण केले असल्याने रस्ता पूर्णपणे नष्ट झाला. त्यामुळे या रस्त्यावरील शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.शेतात सोयाबीन काढणीचा हंगाम उलटला असून परिसरातील सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन बाजारपेठेत विकलेही गेले आहे; परंतु विष्णोरा येथील शेतकऱ्यांना जाण्याकरिता रस्ताच नसल्याने अद्याप सोयाबीनची काढणीही करता आली नाही. परिणामी, त्यांच्यावर कर्जबाजारी होऊन जगण्याची वेळ आली आहे खरीप हंगामातीलच शेतमाल घरी आणता आला नाही तर तूर पिकाचे काय होणार आणि रबी हंगामातील पेरणी कशी करावी, आदी चिता शेतकऱ्याला त्रस्त करीत आहे. महसूल प्रशासनाने पांदण रस्ता मोकळा करून त्याची दुरूस्ती करावी तथा नाले बुजवून शेताची वहिवाट करण्याकरिता रस्ता उपलब्धकरूनद्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# रक्तदान करून अटलजींना अभिवादन

## नवनिर्वाचीत अध्यक्षांचा व सदस्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६परतवाडा–** भारतरत्न माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त अचलपूर व परतवाडा शहरात विविध कार्यक्रम घेण्यात आले. रक्तदान शिबिर, अटल स्मृती संमेलन, स्मृती प्रदर्शनी व नवनियुक्त नगराध्यक्षांचा व नगरसेवकांचा सत्कार सोहळा गुरूवारी उत्साहात झाला. यावेळी आ. प्रवीण तायडे, आ. केवळराम काळे व भाजपाचे जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर उपस्थित होते. प्रमुख वक्ता गजानन कोल्हे म्हणाले की, देशात अटल बिहारी वाजपेयी जन्मशताब्दी वर्ष हे सुशासन दिवस म्हणून साजरे होत आहे. भारतीय जनता पक्षाचे हे आधुनिक रूप आहे. जनसंघाचे



वेळी दिवा या चिन्हापासून राजकीय सुरुवात झाली होती. आज कमळ आपल्या हाती आले आहे. यामागे अनेक नेत्यांचे, कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम, बलीदान आहे. भारतीय जनता पार्टीचे आताचे रूप हे आधुनिक रूप आहे. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकार्यापर्यंत पोहोचणे गरजेचे असल्यामुळे जन्मशताब्दी वर्ष सुशासन दिवस म्हणून साजरे करण्यात येत आहे .यावेळी नवनियुक्त नगराध्यक्ष रूपाली माथने, अंजनगावचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले, धारणी नगरपंचायत अध्यक्ष सुनील चौथमल, नगरसेवक चंद्रेश बहोरिया, दुर्गा विवेक सोनपरोते, अक्षरा लहाने, पद्मिनी बेंडे, सुरेंद्र तांबे तसेच चांदूर बाजार व अंजनगाव सुर्जी येथील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते झाला.

# कापसाच्या पैशांवर बँकांचा डल्ला उद्धवसेना देणार अधिकाऱ्यांना उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६दर्यापूर–** सीसीआयमार्फत कापूस विक्री केलेल्या शेतकर्यांच्या खात्यात जमा होणारी रक्कम थकित कर्जाच्या नावाखाली थेट कर्ज खात्यात वर्ग केली जात असल्याच्या तक्रारी तालुक्यात वाढल्या आहेत. शेतकर्यांचे आधार कार्ड ज्या बँकेत लिंक आहे, त्या बँकांकडून परस्पर कर्जवसुली केली जात असल्याचा आरोप शेतकर्यांकडून केला जात आहे. या पृष्ठभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांनी तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकारी तसेच ल्हा व्यवस्थापक, अग्रणी बँक अमरावती यांच्याशी थेट चर्चा करून निवेदन सादर केले.कर्ज थकित असलेल्या शेतकर्यांच्या खात्यात जमा होणारी सीसीआयची रक्कम, शेतकरी अनुदान किंवा इतर कोणतेही शासकीय पैसे बँकांनी परस्पर कर्ज खात्यात वर्ग करू नयेत, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. यानंतरही जर कोणत्याही बँकेने अशी वसुली केली, तर संबंधित




बँक अधिकार्याला शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ असा स्पष्ट इशाराही युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांनी दिला आहे.

दरम्यान, शेतकर्यांचे पैसे कर्ज खात्यात वर्ग केल्यानंतर ते परत देण्यास बँक टाळाटाळ करत असल्यास, अशा पीडित शेतकर्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या प्रकारामुळे शेतकर्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, प्रशासन व बँकांनी तात्काळ स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी केली जात आहे.

# अमली पदार्थांची तपासणी मोहीम सुरू

## शहरातील ३७ बंद कारखान्यांची झाडाझडती

### टेक्निकल युनिटव्दारा तपासणी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–**अमली पदार्थांची तस्करी आणि विक्री निर्मूलनासाठी कायदेशीर कारवाई करून पोलिस विभागाच्या वतीने राज्यस्तरावर मोहीम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने गुरुवारी अमरावती शहर पोलिसांनी एमआयडीसी आणि शहराच्या हद्दीत असलेल्या ३७ बंद कारखान्यांची झाडाझडती घेतली, अशी माहिती पोलिस उपायुक्त गणेश शिदे आणि डीसीपी श्याम घुगे यांनी दिली. यावेळी गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चौहान आणि पोलिस निरीक्षक पुनीत कुलट उपस्थित होते.डीसीपी गणेश शिदे यांनी सांगितले की, राज्यात विविध ठिकाणी ड्रग्जविरुद्ध कारवाई केली जात आहे. कौतुकास्पद अमरावतीमध्येही कारवाई सुरू आहे. हे लक्षात घेऊन पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार गुरुवारी अमरावतीशहरात विशेष शोधमोहीमराबविण्यात आली. या कारवाईदरम्यान, नांदगावपेठ, राजापेठ, बडनेरा आणि वलगाव पोलिस स्टेशन परिसरातील३७ कारखान्यांची झडती घेण्यात आली. यामध्ये संबंधित पोलिस स्टेशन आणि गुन्हे शाखेतील अधिकारी आणि कर्मचारी यांचा समावेश होता.शहरातील दुर्गम भाग, औद्योगिक बसाहती, कारखाने, गोदामे आणि इतर भागांसह संवेदनशील ठिकाणी एकाच वेळी शोध घेण्यात आला.टेक्निकल युनिटकडून





तपास या कारवाईदरम्यान, डीसीपी शिदे यांनी सांगितले की, बेकायदेशीर ड्रग्ज व्यापारात सहभागी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी पोलिस वचनबद्ध असून शोध मोहिम सुरु राहिल. ही तपासणी केवळ प्राथमिक उपाययोजना म्हणून करण्यात आली होती, परंतु पुढील तपास तांत्रिक युनिटकडून केला जाईल.जर अचानक मोठ्या प्रमाणात रसायने, ड्रम, प्रयोगशाळेतील उपकरणे, रात्रीच्या वेळी निर्जन भागात संशयास्पद हालचाल, अंमली पदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाणारे कोणतेही साहित्य किवा इतर संशयास्पद काही आढळले तर त्यांनी त्वरित जवळच्या पोलिस ठाण्याला कळवावे आणि ड्रग्जमुक्त समाज निर्माण करण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस विभागाने केले आहे.

# चिचफैल भागात प्रतिबंधित नायलॉन मांजा जप्त

## एक आरोपी ताब्यात, राजापेठ पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती,**
प्रतिबंधित नायलॉन मांजावर राजापेठ पोलिसांनी कडक कारवाई केली आहे. गुरुवारी केलेल्या कारवाईत आरोपीच्या घरातून २०,००० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. पोलिसांनी बेकायदेशीर नायलॉन मांजा खरेदी–विक्री करणाऱ्यांविरुद्ध मोहीम सुरू केली आहे.

माहितीनुसार, राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चिचफैल परिसरात एक व्यक्ती घरातून सरकारी बंदी घातलेला नायलॉन मांजा विकत होता. माहितीवरून कारवाई करत पोलिसांनी आरोपीच्या घरावर छापा टाकला आणि आरोपी शशिकांत सुभाषराव काटे (५२, चिचफळ) याला ताब्यात घेतले. झडती दरम्यान, त्याच्या

ताब्यातून मोनो काईट कंपनीच्या नायलॉन मांजाचे १७



आणि ८ गोल्ड कंपनीचा नायलॉन मांजा ८ नग असे एकूण २०,००० रुपयांचा बंदी घातलेला नायलॉन मांजा जप्त करण्यात आला. राजापेठ पोलिसांनी या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस आयुक्त राकेश कुमार ओला आणि पोलिसनिरीक्षक पुनीतकुलट यांनी ही कारवाई केली. या कारवाईत एपीआय मिलिंदहिवरे, सागर सरदार, पवनतिवारी, दिनेश भिसे, संजय कडू आणि अंकुश काळे यांनी सक्रिय सहभाग घेतला. पोलिस प्रशासनाने नागरिकांना बंदी घातलेल्या नायलॉन मांजाचा वापर किवा विक्री करू नये असे आवाहन केले आहे, कारण यामुळे मानवी जीवन, पक्षी आणि पर्यावरणाला गंभीर नुकसान होते.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्त्यांचा आढावा

## अचलपूरमध्ये आमदार प्रवीण तायडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अचलपूर –** अचलपूर विधानसभा मतदारसंघातील मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सुरू असलेल्या व प्रलंबित कामांचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. ही बैठक आमदार प्रवीण तायडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.बैठकीस उपविभागीय अधिकारी अचलपूर, महसूल विभागाचे अधिकारी, गटविकास अधिकारी अचलपूर व चांदूरबाजार, तहसीलदार अचलपूर व चांदूरबाजार, वन विभाग, पोलीस प्रशासन तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. यासोबतच शेतकरी बांधव आणि भारतीय जनता पार्टी अचलपूर तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या बैठकीत पाणंद रस्त्यांची सद्यस्थिती, प्राधान्याने पूर्ण करावयाची कामे, निधीविषयक बाबी यावर सविस्तर चर्चा झाली. शेतीमाल वाहतुकीत येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर करण्यावर भर देण्यात आला.मार्गदर्शन करताना आमदार प्रवीण तायडे म्हणाले, पुढील काळात एकही शेतकरी रस्त्याविना वंचित राहणार नाही. प्रत्येक शेतकऱ्याच्या दळण वळणाचा मार्ग मोकळा केला जाईल. शेतीमाल वाहतुकीसाठी पाणंद रस्ते मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरणार आहेत.बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत प्रलंबित रस्ते तातडीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या. समन्वयाने व दर्जेदार पद्धतीने कामे पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठक समाधानकारकपणे संपन्न झाली असून शेतकऱ्यांना लवकरच प्रत्यक्ष लाभ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात.

# रहमान नगरात घरावर छापा

## ४ तलवारी, २ चाकूसह एकास अटक

### नागपुरी गेट पोलिसांकडून बेकायदेशीर शस्त्रे जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती–** नागपुरी गेट पोलिस स्टेशन परिसरातील रहमान नगर येथे पोलिसांनी एकाघरावरछापाटाकून ४ तलवारी, २ चाकू जप्त केले. अमीन खान आशिक खान (२३, रहमान नगर, टॉवर लाईन) याला अटक केली असून गुन्हा दाखल केला. नागपूरी गेट पोलिस पथकाने गुरुवारला सकाळी ही मोठी कारवाई केली.



माहितीनुसार, नागपुरी गेट पोलिसांना रहमाननगर परिसरातील आरोपीच्या घरात शस्त्रे लपवल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी अमीन खान आशिक खानच्याघरी छापा टाकला. झडतीदरम्यान, आरोपीच्या घरातून चार तलवारी, एक लोखंडी रॉड आणि दोन स्टील चाकू जप्त करण्यात आले, ज्यांची एकूण किमत ९,००० रुपये आहे. आरोपीविरुद्ध नागपुरी गेट पोलिस स्टेशनमध्ये शस्त्रास्त्र कायद्याच्या कलम ४/२५ आणि एम.पी.ओ.सी. कायद्याच्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला आणि पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय पंकज गुप्ता यांच्यासह डीबी पथकाचे राजेंद्र पिपळे, मलिक अहमद, इरफान रैलीवाले, प्रवीण धंगेकर, अमर पटेल, सागर पंडित, मोहन चौहान, संदीप माकोडे, शेखर गायकवाड, इम्रान खान, मनीष यादव आणि एम.पी.ओ.एस. भारती वानखडे यांनी केली.

# निवडणूक ड्युटीला अनुपस्थिती पडणार महागात

## कर्मचाऱ्यांवर कारवाईचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती** २२राज्य निवडणूक आयोगाने अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीची घोषणा केल्यानंतर निवडणूक प्रक्रियेसाठी मतदान केंद्र प्रमुख व मतदान अधिकारी यांची नियुक्ती केली आहे. मात्र, काही शासकीय, निमशासकीय तसेच खाजगीमहाविद्यालये व कार्यालये, शाळांमधील अधिकारी व कर्मचारी हे



आयोगाने दिलेल्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून वेळेवर वैद्यकीय किंवा ईतर प्रमाणपत्र सादर करून नियुक्ती निवडणूक आदेश रद्द करण्यासाठी अर्ज दाखल करीत आहेत.निवडणूक कर्तव्यातून सूट मिळविण्यासाठी अर्ज करताना राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसारच अर्ज सादर करावेत. तसेच, बनावट वैद्यकीय किंवा ईतर प्रमाणपत्र सादर करून निवडणूक कर्तव्यातून सुट मागणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची शासकीय वैद्यकीय तज्ज्ञांमार्फत तपासणी करण्यात येणार आहे.तपासणीअंती प्रमाणपत्र बनावट किंवा खोटे आढळून आल्यास संबंधितांवर महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे दि. २ ऑगस्ट २००६ चे परिपत्रक तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार शिस्तभंगविषयक कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा–चांडक यांनी दिला आहे.

# अंजनगाव अध्यक्षपदाच्या निवडणुकीत वार्ड ३ ने फिरवला निकालाचा खेळ

## जातीय गणित मोडीत काढत प्रवीण नेमाडे यांची रणनीती ठरली निर्णायक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अंजनगाव सुर्जी**
अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा निकाल केवळ विजय–पराभवापुरता मर्यादित न राहता, स्थानिक राजकारणातील बदलत्या समीकरणांचे स्पष्ट दर्शन घडवणारा ठरला आहे. भाजपचे उमेदवार अविनाश गायगोले यांनी अवघ्या १२४ मतांच्या फरकाने मिळवलेला विजय हा आकड्यांपेक्षा रणनीतीचा विजय असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.या निवडणुकीत बारी समाजाची मते निर्णायक ठरतील, असा पूर्वअंदाज होता. बारी समाजाची सून असलेल्या डॉ. स्पुहा डकरे यांना प्रभाग क्रमांक १, ४ आणि सुर्जी भागातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये लक्षणीय मताधिक्य मिळाले आणि हा अंदाज बहुतांशी खरा ठरला.मात्र, या सर्व गणितांना



छेद देणारा ठरला प्रभाग क्रमांक ३ (बारगनपुरा). बारी समाज बहुल असतानाही या प्रभागात अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार अविनाश गायगोले यांना ११६१ मते मिळाली, जी डॉ. डकरे यांच्यापेक्षा सुमारे साडेतीनशेने अधिक होती. याच मताधिक्यामुळे संपूर्ण शहरातील अत्यंत अटीतटीच्या लढतीत भाजपला आघाडी घेता आली.राजकीय निरीक्षकांच्या मते, प्रभाग क्रमांक ३ मध्ये जर पारंपरिक जातीय मतदानाचा कल कायम राहिला असता, तर अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा निकाल पूर्णतः वेगळा लागण्याची शक्यता होती. त्यामुळेच हा प्रभाग भाजपच्या विजयाचा कणा ठरल्याचे सांगितले जात आहे.या बदलत्या मतदान प्रवाहामागे नगरसेवक प्रवीण नेमाडे यांची भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. स्थानिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत, व्यक्तीगत संपर्क, नियोजनबद्ध प्रचार आणि मतदारांमध्ये विश्वास निर्माण करण्याची रणनीती त्यांनी अवलंबल्याचे बोलले जाते. परिणामी, अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप उमेदवाराला चार अंकी मतांचा टप्पा गाठता आला.विशेष म्हणजे, प्रभाग क्रमांक ३ मधील दोन्ही नगरसेवक उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत. संपूर्ण शहरात भाजपचे ६ नगरसेवक निवडून आले असून, त्यातील सर्वाधिक मताधिक्य याच प्रभागात नोंदवले गेले आहे.

# अंगणवाडी सेविकांना चाकूने कापण्याची धमकी

## मद्यधुंद आरोपींचा रस्त्यावर उतरून गोंधळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**अंगणवाडी सेविकेला शिविगाळ आणि चाकूने कापून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा उघडकीस आला आहे.



आरोपीविरुद्ध फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी अतुल उमरेवर गुन्हा दाखल केला आहे. वृत्तानुसार, बुधवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास, सिद्धार्थ चौकातील अंगणवाडी केंद्र परीसरात राहणारा अतुल उमरे हा दारूच्या नशेत आला. मुलाचे नाव अंगणवाडीत नोंदवण्याची मागणी केली. अंगणवाडी मदतनीसाने मुलाचे वय विचारले असता, त्याने तो तीन वर्षांचा असल्याचे सांगितले. आजूबाजूला चौकशी केल्यावर मुलाचे खरे वय १५ वर्षांचे असल्याचे उघड झाले. मदतनीसाने परत जाण्यास सांगितले, ज्यामुळे आरोपी संतप्त झाला आणि त्याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तिची महिला सहकारी आल्यावर तिने शिवीगाळ केली.

# मेळघाटच्या सीमेवरील तुकईथेडमध्ये मोठा कारवाई

## पंजाबच्या संदीप सरदारला ३ पिस्तुलसह अटक

## १ मॅग्जीन जप्त, मदत करणाऱ्यांचा शोध सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**
मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे अगदी जंगलाला लागून असलेल्या पाचोरी (जि.बुरहानपूर, पो. खकनार) या गावात अवैध शस्त्र बनविण्याचे अनेक कारखाने घराघरात गृहउद्योगा सारखे चालतात, हे पुन्हा पुन्हा सिद्ध होत आहे. २३ डिसेंबर रोजी धारणी तालुक्याच्या अगदी सीमेवरील तुकईथेड जवळच्या झिरमिटी फाट्याजवळ एका संदिग्ध अवस्थेतील युवकाला पकडून ३ देशी कट्टे व एक मॅग्जीन जप्त केल्याने एकच खळबळ



उडाली आहे.धारणी शहरा पासून फक्त २४ किलोमीटर अंतरावरील तुकईथड जवळच एका फाट्यावर पंजाबचा युवक पिस्तुली व मॅग्जीन घेऊन उभा असल्याची माहिती खकनार पोलिसांना प्राप्त झाल्यावर ठाणेदार अभिषेक जाधव तथा सहायक उपनिरीक्षक मनीष कुमार यांनी सापळा रचून संदीप काबलसिंग वय १९ रा. नगलीफरीदनगर, अमृतसर पंजाब यांस मुद्देमालासह अटक केली. संदीपच्या बॅगेत ३ देशी बनावटीच्या पिस्तुली व एक नग मॅग्जीन (एकूण किंमत १ लक्ष रूपये) सापडले. आरोपीच्या विरोधात अपराध क्र. ५६४/२०२५ कलम २५१–बी अ आर्म्स ॲक्टप्रमाणे कारवाई करण्यात आली.

# तळेगाव ठाकूर येथे भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी

## उमेद कॅडर महिलांचा बॅग,शॉल देऊन सन्मान..

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६तिवसा** भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जे ६ वर्ष ८० दिवस प्रधानमंत्री होते त्यांनी त्या सहा वर्ष ८० दिवस या कालावधी मध्ये उत्कृष्टपने भारताचे नेतृत्व करत देशाला प्रगती वर नेले अशा थोरपुरुष भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर मध्ये भारतीय जनता पार्टी यांच्या वतीने



करण्यात आली.सर्वप्रथम भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन,पुष्पहार घालून करण्यात आले.भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवन चरित्रावर मार्गदर्शन करण्यात आले. तळेगाव ठाकूर मध्ये जयंती निमित्य पंचायत समिती उमेद कॅडर महिलांचा सन्मान करण्यात आला असून यामध्ये सी आर पी मालती पवार,रजनी श्रीखंडे,वंदना भुरले,जोशना राघोर्ते,सुनीता चौधरी,बँक सखी जयश्री आढाव,वर्षा कोसे या महिलांचा त्यांच्या कार्यासाठी शॉल,बॅग छायाताई दंडाळे यांच्या कडून सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ.पालिवाल,विनोद डेहनकर,श्रीकृष्ण बांते,अमोल डाहाके,बबिता पालिवाल,सुरज वानखडे(सुरवाडी),मनोज निघोट,कल्याण पाटील,शाम पवार,गणेश मोहतुरे तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

# भाजपला ६ नगराध्यक्ष, तरीही ३ ठिकाणी उपाध्यक्षपद गमावण्याची शक्यता

## काँग्रेसला २ नगराध्यक्ष असूनही ६ ठिकाणी उपाध्यक्षपदाची संधी, युती-आघाडीला वेग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

नगराध्यक्षपदावर विजय मिळवूनही अनेक नगरपालिकांमध्ये नगरसेवकांच्या संख्याबळाअभावी पक्षांना उपाध्यक्षपद आणि स्वीकृत नगरसेवकांच्या जागा मिळवणे कठीण झाले आहे. सहा नगराध्यक्ष जिंकूनही भाजपला तीन ठिकाणी उपाध्यक्षपद गमवावे लागण्याची शक्यता आहे, तर केवळ दोन नगराध्यक्ष जिंकणाऱ्या काँग्रेसला सहा ठिकाणी उपाध्यक्षपदाची संधी निर्माण झाली आहे.

मोर्शीमध्ये तीन प्रमुख पक्षांचे प्रत्येकी सहा नगरसेवक असल्याने तिथे राजकीय पेच निर्माण झाला आहे. चांदूर रेल्वेमध्ये वंचित बहुजन आघाडीने नगराध्यक्षपद जिंकले



असले तरी, भाजपने निम्म्याहून अधिक नगरसेवक जिंकल्यामुळे वंचितला आपले वर्चस्व राखणे आव्हानात्मक ठरत आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी अनेक ठिकाणी निवडणुकीनंतर महायुती आणि महाविकास आघाडी स्थापन करण्याच्या हालचालींना वेग आला आहे.

काही पक्ष इतरांना सोबत घेऊन स्वतंत्र मान्यताप्राप्त गट स्थापन करण्याच्या प्रयत्नात आहेत. अशा गटांनाच उपाध्यक्षपद आणि स्वीकृत नगरसेवकांच्या जागा मिळवता येणार आहेत. यामुळे स्थानिक राजकारणात नवीन समीकरणे उदयास येत आहेत.

भाजपने धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, धारणी, वरुड आणि शेंदुरजनाघाट येथे नगराध्यक्षपदे जिंकली आहेत. यापैकी धामणगाव रेल्वे, वरुड आणि शेंदुरजनाघाट या तीन नगरपालिकांमध्ये भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळे या तीन ठिकाणी भाजपला उपाध्यक्षपद सहज मिळू शकते, परंतु स्वीकृत सदस्यांसाठी त्यांना अधिक प्रयत्न करावे लागतील.


याउलट, दर्यापूर आणि चिखलदरा येथे नगराध्यक्षपद जिंकणाऱ्या काँग्रेसला संख्याबळाच्या जोरावर संधी आहे. भाजपकडे नगराध्यक्षपद असलेल्या अचलपूर, अंजनगाव सुर्जी आणि धारणी तसेच शिवसेनेने (उबाठा) जिंकलेल्या नांदगाव खंडेश्वर येथे महाविकास आघाडीचा प्रयोग यशस्वी करून काँग्रेसला उपाध्यक्षपद आणि स्वीकृत नगरसेवकांच्या जागा मिळवता येऊ शकतात.धामणगाव रेल्वे नगरपालिकेत भाजपने नगराध्यक्षपदासह एकहाती सत्ता मिळवली आहे. त्यामुळे त्यांना उपाध्यक्षपद आणि स्वीकृत नगरसेवकांची जागा मिळवण्यात कोणतीही अडचण येणार नाही. वरुडमध्येही भाजपने २६ पैकी १८ जागा जिंकून आघाडी घेतली आहे, त्यामुळे तिथे उपाध्यक्षपद सहजपणे मिळवता येईल.

मात्र, वरुडमध्ये नगरसेवकांच्या संख्याबळानुसार स्वीकृत नगरसेवकांची तीन पदे मिळवणे भाजपसाठी आव्हानात्मक ठरू शकते. येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे ४, काँग्रेसचे २ आणि प्रहारचा १ सदस्य एकत्र आल्यास ते एक स्वीकृत नगरसेवक पद मिळवू शकतात.

पहिल्याच बैठकीत उपाध्यक्षांच्या निवडणुकीसोबतच स्वीकृत नगरसेवकांचीही निवड केली जाणार आहे. एकूण सदस्यांच्या दहा टक्के जागा स्वीकृत सदस्यांसाठी राखीव असतात. ही पदे आपल्याकडेच यावीत यासाठी सर्वत्र राजकीय चढाओढ सुरू आहे.

# मेळघाटातील बागलिंगा गाव १४ गावांना पाणी देणार

## सातपुडा पायथ्याशी लघु जलसिंचन प्रकल्प अंतिम टप्प्यात



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मेळघाट**

मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या बागलिंगा गावात एक लघु जलसिंचन प्रकल्प (धरण) आकार घेत आहे. या प्रकल्पामुळे बागलिंगासह १४ गावांना पिण्याच्या पाण्याची समस्या सुटण्याची आशा निर्माण झाली आहे, ज्यामुळे हे छोटेसे गाव मेळघाटाच्या केंद्रस्थानी आले आहे.

मेळघाटात मुसळधार पाऊस पडत असला तरी, पाणी साठवणुकीच्या ठोस योजनांअभावी आदिवासी गावांना वर्षानुवर्षे पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत, या धरणामुळे परिसरातील ग्रामस्थांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये येणारा हा लघु जलप्रकल्प मुख्य अभयारण्यापासून ८.५ किलोमीटर अंतरावर आहे.

मोठ्या धरणांच्या तुलनेत हा प्रकल्प लहान असला तरी, यात पाणी साठवून एकूण १४ गावांना पिण्याचे पाणी पुरवले जाणार आहे. याशिवाय, लगतच्या गावातील शेतीलाही याचा फायदा होईल, असे बागलिंगा गावाच्या सरपंच निर्मला धांडेकर यांनी सांगितले. प्रकल्पासाठी सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेली शेतजमीन सरकारने संपादित केली असून, शेतकऱ्यांना योग्य मोबदलाही मिळाला आहे.

या प्रकल्पाची सुरुवात २००९ साली झाली असून, राज्य वन्यजीव मंडळानेही याला परवानगी दिली आहे. येथे खोदकाम करून एक भव्य तलाव निर्माण करण्यात आला आहे, ज्यात आता पावसाळ्यात पाणी साचले आहे. प्रकल्पाच्या खालच्या बाजूला पाणी शुद्धीकरण केंद्राद्वारे प्रक्रिया करून ते पिण्यायोग्य बनवले जाईल. बागलिंगा ग्रामपंचायत अंतर्गत लगतच्या १४ गावांना पाणीपुरवठा केला जाईल, असे सरपंच धांडेकर यांनी स्पष्ट केले.

या प्रकल्पाचे काम आता अंतिम टप्प्यात आहे. बागलिंगा गावात जलशुद्धीकरण केंद्राचे काम वेगाने सुरू असून, पाणी साठवणुकीसाठी एक मोठी टाकीही बांधली जात आहे. यंत्रणेच्या म्हणण्यानुसार, वर्षभरात या प्रकल्पाची सर्व कामे पूर्ण होतील.

या प्रकल्पातून बागलिंगा, चिचखेडा, कुलंगणा, मोझरी, वस्तापूर, सोमवारखेडा, मलकापूर, रामटेक, डोमनबल्ला, हरदामल, चिवाती, बदनापूर आणि कालापाणी या १४ गावांना पाणीपुरवठा केला जाईल.

# विदर्भातील ५०० सायकलपटू होणार सहभागी ११ जानेवारीला अमरावतीत भव्य सायकल स्पर्धा

## श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

सायकल क्रीडेला चालना देत तरुणाईमध्ये आरोग्य, शिस्त आणि क्रीडावृत्ती रुजविण्याच्या उद्देशाने अमरावती सायकलिंग संघटना, दिशा संस्था तसेच श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित पदवी शारीरिक शिक्षण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या ११ जानेवारी २०२६ रोजी विदर्भस्तरीय भव्य सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.ही स्पर्धा सकाळी ६.३० ते ९.३० या वेळेत सलुजा सेलिब्रेशन लॉन, जुना बायपास, औद्योगिक वसाहत रस्ता येथून सुरू होणार आहे. या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांतील सुमारे ५०० सायकलपटू सहभागी होणार असून नवोदित ते अनुभवी खेळाडूंना समान संधी मिळणार आहे.स्पर्धा विविध वयोगटांत घेण्यात येणार असून१२ वर्षांखालील वयोगटासाठी १० व १२ कि.मी.,१५ वर्षांखालील वयोगटासाठी १५ कि.मी.,१८ वर्षांखालील वयोगटासाठी २० व २५ कि.मी.,२१ वर्षांखालील वयोगटासाठी ३२ कि.मी.,खुला वयोगट (पुरुष व महिला) तसेच४० वर्षांवरील पुरुष व महिला यांच्यासाठी ५० कि.मी. अंतर निश्चित करण्यात आले आहे.सर्व वयोगटांचे अंतर ठरविताना सुरक्षितता, क्षमता व स्पर्धात्मकतेचा समतोल राखण्यात आला आहे.स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख बक्षिसे व चषक देण्यात येणार असून प्रथम क्रमांकास ५,००० रुपये, द्वितीय क्रमांकास ३,००० रुपये व तृतीय क्रमांकास २,००० रुपये रोख बक्षीस दिले जाणार आहे. तसेच सर्व वयोगटांतील विजेत्यांना चषक आणि स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक पूर्णता पदक देण्यात येणार आहे.नोंदणी केलेल्या प्रत्येक स्पर्धकाला आयोजकांकडून टी-शर्ट देण्यात येणार आहे. १० ते २१ वर्षे वयोगटासाठी नोंदणी शुल्क ४९९ रुपये, तर खुल्या व ४० वर्षांवरील वयोगटासाठी ७९९ रुपये निश्चित करण्यात आले आहे. नोंदणीची अंतिम तारीख ३० डिसेंबर २०२५ असून मर्यादित प्रवेशामुळे एकूण ५०० स्पर्धकांनाच सहभागाची संधी मिळणार आहे.स्पर्धकांच्या सुरक्षिततेस विशेष प्राधान्य देण्यात आले असून सुरक्षात्मक हेल्मेट वापरणे बंधनकारक राहणार आहे. तसेच प्रथमोपचार सुविधा, तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी व त्यांची चमू स्पर्धास्थळी सतत उपलब्ध राहणार आहे. संपूर्ण मार्गावर आवश्यक ती सुरक्षा व व्यवस्थापनाची खबरदारी आयोजकांकडून घेण्यात येणार आहे.स्पर्धेसाठी नोंदणी ऑनलाईन संकेतस्थळावरून तसेच जय फोटो स्टुडिओ, गांधी चौक; डॉ. सागर यांचे उत्कर्ष निसर्गोपचार व्यायाम केंद्र, विवेकानंद कॉलनी, रुक्मिणी नगर; अमरावती पाइप हाऊस, रायली फ्लॅट येथे प्रत्यक्ष अर्जाद्वारेही करता येणार आहे. अधिक माहितीसाठी श्रीराम देशपांडे, सागर धनोडकर, लक्ष्मीकांत खंडागले, पियुष श्रीसागर, सोनी मोटवानी, प्रविण जयस्वाल, विरेंद्र तरटे, वैशाली सरागे, कविता धुर्वे व सुषमा जोशी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.विदर्भातील सायकलप्रेमींना एकत्र आणणारी, आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणारी आणि क्रीडा संस्कृतीला चालना देणारी ही स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे वारे

## इच्छुकांची धावपळ, नेत्यांभोवती गर्दी वाढली




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची चाहूल लागताच राजकीय वातावरण तापू लागले असून गावागावात निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. उमेदवारीचा विचार करणार्या इच्छुकांनी तयारीला वेग दिला आहे. मतदारांशी जवळीक वाढवण्यासाठी कुणी शेत जेवणांच्या माध्यमातून जनसंपर्काची सुरुवात केली आहे, तर कुणी सोशल मीडियावर सक्रिय होत स्वतःची प्रतिमा उजळविण्याच्या प्रयत्नात आहे. काही उमेदवारांनी देवदर्शनाची वारी सुरू करत, 'ईश्वरकृपेने विजय मिळेल' अशी श्रद्धा व्यक्त करत असल्याचे दिसून येते. निवडणूक जवळ येत असल्याने स्थानिक नेत्यांच्या भोवती गर्दी वाढू लागली आहे. उमेदवारीचा तिकीट मिळावे, आशीर्वाद लाभावा यासाठी भेटीगाठींचे सत्र सुरू आहे. त्यात नातेवाईक व परिचितांमध्येही चर्चांना उधाण आले असून, काही ठिकाणी नातेवाईकांनीही तिकीटासाठी दावे-महत्वाकांक्षा व्यक्त केल्याने नेत्यांची विकट परिस्थिती निर्माण होत आहे.कोणावरही पक्षपातीपणाचा ठपका येऊ नये, म्हणून अनेक नेते सावध भूमिका घेताना दिसत आहेत. त्यामुळे 'आपल्यामधला कोण खरा दावेदार ?' हा प्रश्न राजकीय विश्लेषकांसमोर निर्माण झाला आहे. दरम्यान, काही पक्षांमध्ये अंतर्गत नाराजी पृष्ठभागावर येऊ लागली आहे. इच्छुकांना अपेक्षित महत्त्व न



मिळाल्यास पक्षांतराची शक्यता नाकारता येत नाही. विविध राजकीय पक्षांत ये-जा, चाचपणी व गुप्त चर्चांना वेग आला असून, योग्य संधी मिळताच कट्टर समर्थकदेखील नवीन पर्यायांचा विचार करीत असल्याचे संकेत मिळत आहेत.

### सर्व काही मतदारांच्या हातात

एकूणच, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी दिवसेंदिवस रंगत असून पुढील काळात राजकीय समीकरणांमध्ये उलथापालथ होण्याची दाट शक्यता आहे. स्थानिक पातळीवरील स्पर्धा अधिक चुरशीची होणार असल्याचे चित्र स्पष्ट आहे. मतदार कोणाला विश्वासाची शिक्कामोर्तब करतील, याची उत्सुकता मात्र वाढतच चालली आहे.

# रेशन दुकानदारांचा 'आदर्श' पुरस्काराने होणार गौरव



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**

आज शासकीय सेवेतील अनेक कर्मचाऱ्यांना शासनाद्वारे आदर्श पुरस्कार देण्यात येतो. त्याच धर्तीवर शासनासाठी काम करणाऱ्या रास्त भाव दुकानदार (रेशन) यांच्या कार्याची दखल घेऊन पुरवठा विभाग तहसील कार्यालय, तिवसा द्वारा 'श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आदर्श रेशन दुकान' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. रास्त भाव दुकानदार बंधू-भगिनींच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या कार्याचे कौतुक व्हावे, तसेच कार्यासाठी प्रोत्साहन मिळावे याकरिता अमरावती जिल्ह्यात प्रथमच असा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे निरीक्षण अधिकारी शीतल आंबटकर यांनी सांगितले. पुढील वर्षी २६ जानेवारीला मान्यवरांच्या हस्ते तालुक्यातील उत्कृष्ठ तीन दुकानाला सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.मुख्य सभागृह तहसील कार्यालय तिवसा येथे निवासी नायब तहसीलदार नरेंद्र कुरळकर यांच्या अध्यक्षतेत राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. यावेळी दुकानदाराच्या उपस्थितीत पुरवठा निरीक्षक एस.एस. वानखडे यांनी सविस्तर माहिती दिली.

### माहिती देण्यासाठी संपर्क व्यक्तीची निवड

पुरवठा विभागातील माहितीचे आदान प्रदान गतिमान होण्याच्या उद्देशाने तालुक्यातील कार्यकुशल व तंत्रज्ञानात प्रगत असलेल्या निवडक दुकानदारांची संपर्क व्यक्ती म्हणून निवड करण्यात आली. यामध्ये अंकुश प्रधान, आशिष माहुरे, इरफान हुसैन, महेश वानखडे, नरेश भोयर, नितीन इंगोले, नीलेश कठाणे, योगेश इंगोले आदींचा समावेश आहे.

### आठ विषयांचे मुल्यमापन; त्यानूसार होणार निवड

तिवसा तालुका हा अनेक थोर संताची कर्मभूमी असल्याने येथील शासकीय आस्थापना सर्वांगसुंदर व आदर्श असावे, या उद्दिष्टाने हा उपक्रम नवीन वर्षात राबवला जाणार असून एकूण आठ विषयाचे मूल्यमापन करून रास्त भाव दुकानांची प्रतवारी ठरवली जाणार आहे. यामध्ये फलक, विविध दस्तऐवज, कार्यालयीन आदेश पूर्तता, स्वच्छता व टापटीप, सामाजिक उत्तरदायीत्व, गतीशील धान्य वाटप, लाभार्थी सुविधा, दुकान उपलब्धता, अद्यावत राशन कार्ड, सायलेंट रेशन कार्ड आठ विषयांसाठी एकूण १०० गुणांचे मूल्यमापन होणार आहे. पुरवठा विभागातील अधिकारी यांचे प्रत्यक्ष रास्त भाव दुकान भेटीदरम्यान आठ मुद्यांचे अवलोकन केले जाणार.

# उपेक्षित शकुंतला रेल्वेचा ११२वा वाढदिवस आयोजित. समस्त सत्याग्रहिंची ३८ वी आढावा बैठक संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि २६ अचलपूर**

येणाऱ्या केंद्र अर्थसंकल्पात शकुंतला रेल्वेला स्पेशल प्रोजेक्ट दर्जा देऊन चार जिल्हाला न्याय देण्यात यावा व ब्रॉडगेज कार्य लवकर सुरू करण्यात यावा म्हणून आग्रही सत्याग्रहिंचे केंद्रीय रेल मंत्री यांना जनतेने लिहिलेले ५ हजार पत्र होणार दिल्ली पोहचनार..तर रेल्वेचा वाढदिवस साजरा करून ३८ वे प्रतिकात्मक जनआंदोलनाची रूपरेखा ठरली आहे.



शकुंतला रेल्वेचा ११२वा वाढदिवस व सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे पत्रकारबांधव यांच्या सन्मान , आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती प्रीत्यर्थ आयोजीत.अन्य विषयावरील नियोजन बैठक संपन्न*.आज रोजी परतवाडा येथील रामजी पॅलेस येथे १ जानेवारी २०२६ रोजी ऐतिहासिक शकुंतला रेल्वेच्या ११२ व्या होणाऱ्या वाढदिवस व ३८ व्या जनआंदोलन प्रति आढावा बैठक पार पडली आहे, उपेक्षित शकुंतला रेल्वेला लवकरात लवकरात लवकर सुरू करून येणाऱ्या अर्थ संकल्प मधे शकुंतला रेल्वेला स्पेशल प्रोजेक्ट दर्जा देण्यात यावा यासाठी समस्त रेल बचाव सत्याग्रही व सामाजिक संघटन गेल्या सात वर्षे पासून पूर्ण तन मन धन ने कार्यरत आहे, अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ जिल्ह्याला जोडणारी जीवनवाहिनी साठी प्रयत्न सातत्याने करत आहे, लीगल सर्व बाबी मोकळ्या होऊन डीपीआर होऊन सुद्धा शकुंतला इतक्या सदन परिसर मधे गुलाम का? हा प्रश्न सत्याग्रही वारंवार शासन दरबारी विचारत आहे.आज रोजी शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समिती सदस्य यांनी आढावा बैठक मधे १ जानेवारी शकुंतला रेल्वेचा जन्मदिन साजरा, आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्ताने समाजसेवी पत्रकार, संपादक यांचा सन्मान, केंद्रीय रेल मंत्री यांना जनतेच्या ५ हजार पत्रा सोबत ७ वर्षाचे आंदोलन, पाठपुरावा, सामाजिक संघटन समर्थन पत्र दिल्ली पोहचत करणार आहे. सदर आढावा बैठकीत विविध सामाजिक संघटन पदाधिकारी सोबत शकुंतला रेल बचावचे योगेश खानजोडे, डॉ राजा धर्माधिकारी, सौ दिपा अमोल तायडे, सौ शारदा ऊईके,राजेश अग्रवालरबँकवाले, कमल केजरीवाल, रामदास मसने, विजय गोंडचवर, दयाराम चांदेले, वसंतराव धोबे, एस.बी. बारखडे, राजेश पांडे, संजय डोंगरे, सुरेश प्रजापती, प्यारेलाल प्रजापती व सुरेश वाधवाणी उपस्थित होते.

# सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावावर बालकांना नेण्याचा झाला प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६शिरजगाव कसबा**

शिरसगाव कसबा येथील काही बालकांना (पाच ते दहा वयोगटातील) सांस्कृतिक कार्यक्रमासाठी गुरुवारी महिला - बाहेरगावी घेऊन जात होती. सदर महिला या बालकांचे धर्मांतरण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप स्थानिक - बजरंग दल कार्यकत्यांनी केला आहे. या प्रकरणी बजरंग दल कार्यकर्त्यांनी पोलिसांना निवेदन देऊन सखोल चौकशी करण्याची - मागणी केली आहे. पोलिसांनी या घटनेला गांभीयनि घेऊन सखोल चौकशी करून कठोर कारवाईची अपेक्षा गावातून व्यक्त होत आहे. गुरुवारी सकाळी गावातून एका ऑटोमध्ये वीस ते पंचवीस मुले,मुली बाहेर गावाला घेऊन जात असल्यामुळे सुज्ञ ग्रामस्थांना शंका आली. त्यावेळी त्या मुलांना विचारले असता त्यांनी सांस्कृतिक आम्हाला सांगण्यात कार्यक्रमासाठी नेत असल्याचे आले. मात्र गावकऱ्यांना शंका आल्यामुळे त्या ठिकाणी बजरंग दलाचे कार्यकर्ते पोहोचले व त्यांनी पोलिसांना निवेदन दिले आहे.

सखोल चौकशी करणार या प्रकरणी आम्हाला बजरंग दलाच्या पदाधिकारी, कार्यकत्यांनी निवेदन दिले आहे. सदर घटनेबाबत सखोल चौकशी सुरू केली आहे, अशी प्रतिक्रीया ठाणेदार महेंद्र गवई यांनी दिली.

# अर्जासाठी प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य; खर्चाचा हिशेब 'डिजिटल'
## तफावत आढळल्यास लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६चे बिगुल वाजले असून, प्रशासन आणि राजकीय पक्षांची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने इच्छुक उमेदवारांसाठी महत्त्वाच्या आणि कडक सूचना जारी केल्या आहेत. नामनिर्देशन प्रक्रियेपासून ते प्रचार खर्चाच्या हिशेबापर्यंत नियम अधिक पारदर्शक आणि काटेकोर करण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन केल्यास थेट लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.राज्य निवडणूक आयोगाच्या स्पष्ट निर्देशानुसार, या निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज केवळ ऑफलाइन पद्धतीनेच स्वीकारले जाणार आहेत. अर्ज दाखल करताना उमेदवाराने स्वत: प्रत्यक्ष उपस्थित राहणे बंधनकारक असून, कोणताही ऑनलाइन पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. संबंधित



निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज सादर करावा लागणार आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता वेळेत न केल्यास किंवा त्रुटी आढळल्यास अर्ज बाद होण्याची शक्यता असून, याबाबत उमेदवारांनी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.दुसरीकडे, प्रचार खर्चाच्या बाबतीत आयोगाने डिजिटल यंत्रणेला सक्तीचे स्वरूप दिले आहे. निवडणूक प्रचारादरम्यान होणारा प्रत्येक खर्च उमेदवाराला ऑनलाइन पद्धतीने नोंदवणे अनिवार्य आहे. चहा-पाणी, रिक्षा किंवा वाहन भाडे, बॅनर-पोस्टर, पत्रके, सभा-रॅलीचा खर्च, तसेच सोशल मीडिया जाहिरातींसह डिजिटल प्रचारावर होणारा खर्च यांची दैनंदिन नोंद ठेवावी लागणार आहे. ही नोंद दररोज अपडेट करणे कायदेशीर बंधनकारक करण्यात आले असून, खर्च लपविणे किंवा उशिरा नोंद करणे ही गंभीर बाब मानली जाणार आहे.आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येक उमेदवाराने खर्चाच्या हिशेबासाठी स्वतंत्र डिजिटल प्लॅटफॉर्म किंवा अधिकृत ऑनलाइन साइट तयार करणे आवश्यक आहे. या प्लॅटफॉर्मवर खर्चाचा तपशील, दिनांकानुसार नोंद, संबंधित पावत्या आणि इतर पुरावे अपलोड करावे लागतील. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि बेकायदेशीर खर्चावर आळा घालणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.निवडणूक निरीक्षकांना कोणत्याही वेळी उमेदवाराच्या डिजिटल खर्च नोंदी तपासण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. प्रत्यक्ष रॅली, सभा किंवा प्रचाराच्या स्वरूपाशी नोंदवलेल्या खर्चात तफावत आढळल्यास तत्काळ चौकशी करण्यात येणार आहे. खर्चात फेरफार, चुकीची नोंद किंवा लपवाछपवी केल्याचे सिद्ध झाल्यास उमेदवारावर लोकप्रतिनिधी कायद्यानुसार कठोर कारवाई होऊ शकते. गंभीर प्रकरणात उमेदवाराची निवडणूक रद्द होणे किंवा भविष्यात निवडणूक लढविण्यावर बंदी येण्याची शक्यताही नाकारता येत नाही.एकूणच, अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी आयोगाने ऑफलाइन अर्जप्रक्रिया आणि ऑनलाइन खर्च नोंदणीचा दुहेरी नियम लागू केला असून, यामुळे उमेदवारांच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत. नियमांचे काटेकोर पालन केल्यासच निवडणूक लढविण्याचा मार्ग सुकर राहणार असून, अन्यथा नियमभंग महागात पडण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत.

# विदर्भात महायुतीचे ठरले! चार महापालिकांत शिंदेसेना
## तर दोन ठिकाणी अजित पवारांची राष्ट्रवादी महायुतीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ नागपूर**

विदर्भातील चार महापालिकांसाठी भाजपने महायुतीसंदर्भातील घेतला आहे. चार महापालिकांमध्ये भाजप-शिंदेसेना एकत्र लढणार आहेत, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) दोन महापालिकांमध्येच सोबत असणार आहे. अमरावतीमध्ये भाजप-शिवसेना आणि रवी राणा यांचा युवा स्वाभिमानी पक्ष एकत्र निवडणूक लढवणार आहे, असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, अकोला आणि अमरावती या महापालिकांची निवडणूक होत आहे. या निवडणुकीत भाजपने दोन ठिकाणी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबत घेण्याचा, तर दोन ठिकाणी न घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. महापालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महायुती एकत्र लढणार की नाही, याबद्दल विदर्भातील चार महापालिकांमध्ये संभ्रम होता.



अखेर तो निर्णय घेण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रपूर आणि अकोलामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) महायुतीत असणार आहे. तर नागपूर, अमरावतीमध्ये भाजपा-शिंदेसेना युतीत लढणार आहेत. नागपूर आणि अमरावतीमध्ये अजित पवारांची राष्ट्रवादी स्वतंत्र लढणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### अमरावतीमध्ये भाजपा-शिंदेसेना-युवा स्वाभिमानी पक्ष

अमरावती महापालिकेमध्ये भाजपा-शिंदेसेनेसोबत आमदार रवी राणा यांचा युवा स्वाभिमानी पक्ष असे तिघे एकत्र निवडणूक लढवणार आहेत. शिंदेसेना-भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक पार पडली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

### चारही महापालिकांमध्ये एकत्र लढणार


याबद्दल बोलताना शिंदेसेनेचे नेते उदय सामंत म्हणाले की, 'चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होती. त्या बैठकीसाठी आलो होतो. चारही महापालिकांमध्ये युतीबाबत सकारात्मक चर्चा झाली. एकत्र लढण्याचे निश्चित करण्यात आले आहे. अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर या चारही महापालिकांमध्ये शिवसेनेचा मानसन्मान ठेवला जाईल, असे आश्वासन बावनकुळे यांनी दिले आहे. त्यामुळे चारही महापालिकांमध्ये आम्ही एकत्र लढणार आहोत.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, 'चारही महापालिकांमध्ये शिवसेना-भाजपा महायुतीचा निर्णय झाला आहे. उद्या संध्याकाळपर्यंत जागावाटप पूर्ण होईल. अकोलामध्ये राष्ट्रवादी (अजित पवार) सोबत येण्याचे संकेत आहेत आणि अमरावतीमध्ये युवा स्वाभिमानी पक्ष सोबत घेण्याचा प्रयत्न आहे. चंद्रपूरमध्येही राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) सोबत येऊ शकते, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

# शिष्यवृत्ती परीक्षेत जातीवाचक प्रश्न, चार लाखांचा दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६यवतमाळ**

विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती सराव परीक्षेत बाल मनावर विपरित परिणाम करणारा 'उच्च जातीचे नाव काय?' असा प्रश्न विचारणाऱ्या 'टार्गेट पीक प' चालवणाऱ्या रिओ एज्युकेशन कंपनीस जिल्हा परिषद प्रशासनाने चार लाख रूपये दंड आकारून, कंपनीची चूक सुधारण्याचा प्रयत्न केला. दीड कोटीचे कंत्राट घेतलेल्या या कंपनीवर गंभीर कारवाई होण्याऐवजी केवळ माफीनामा आणि अत्यल्प दंड आकारण्यामागे कोणाचे पाठबळ आहे, अशी चर्चा शिक्षण वर्तुळात सुरू आहे.

इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. यंदा त्यात जिल्ह्यातील अधिकाधिक विद्यार्थी उत्तीर्ण व्हावे, या उदात्त हेतूने जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या संकल्पनेतून 'मिशन एक्सलन्स' हा उपक्रम सुरू



Class 8
Ranking Test 2
Test Booklet A
00175

76. उच्च जातीचे नाव काय?
A) ब्राम्हण
B) क्षत्रिय
C) शुद्र
D) वैश्य

78. भारतीय संविधानातील तरतुदीनुसार ________ संघराज्याचे सर्वोच्च प्रमुख असतील.
A) अर्थमंत्री
B) राष्ट्रपती
C) पंतप्रधान
D) सरन्यायाधिश

80. 1893 ला काही कायद्याच्या कामाकरीता महात्मा गांधी ________ गेले.
A) जर्मनीला
B) अमेरिकेला
C) इंग्लंडला

करण्यात आला. त्यासाठी ठाणे येथील 'रिओ एज्युकेशन' कंपनीला मोबाईल पद्वारे विद्यार्थ्यांना धडे देण्याचे कंत्राट दिले. त्यासाठी या कंपनीने सादर केलेली एक कोटी ४९ लाख रुपयांची निविदा मान्य करण्यात आली.

त्या मोबदल्यात या कंपनीने तयार केलेला 'टार्गेट पीक' हा मोबाईल प जिल्ह्यातील २४ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या पालकांच्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करण्यात आला. त्यावर विद्यार्थ्यांना साडेचार लाख व्हिडीओ दाखविण्यात आले व अजूनही दाखविले जात आहेत. ठराविक काही व्हिडीओ पाहिल्यानंतर त्यावर आधारित विद्यार्थ्यांची सराव परीक्षाही घेतली जात आहेत.

६ डिसेंबर रोजी झालेल्या आठवीच्या सराव पेपरमधील 'सेट ए' मधील प्रश्न क्रमांक ७६ हा अनेकांसाठी धक्कादायक होता. या पेपरमध्ये, उच्च जातीचे नाव काय? असा प्रश्न विचारला आणि त्याला अ) ब्राह्मण, ब) क्षत्रिय, क) शूद्र, ड) वैश्य, हे पर्याय दिले होते. हा प्रकार शिक्षक आणि पालकांच्या लक्षात येताच खळबळ उडाली. समाजाच्या सर्वस्तरातून या प्रकाराचा निषेध नोंदविण्यात आला. अनेकांनी हा प्रश्न चुकीचा असल्याचे निदर्शनास आणून दिल्यावर जिल्हा परिषद शिक्षण विभागाने रिओ कंपनीस नोटीस दिली. कंपनीने केवळ लेखी माफीनामा देवून सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला.

या संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी प्रसंगी कंपनीवर कठोर दंडात्मक कारवाई आणि बंदी घालण्याचा विचार केला जाईल, असे सांगितले होते. कपंनीच्या खुलाशानंतर, जिल्हा परिषदेने कडक पाऊल उचलत आता या कंपनीकडून चार लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. जातीवादाला खतपाणी घालणारी चूक करणे रिओ कंपनीला चार लाखांत पडली आहे.

मोबाईल प वापरण्यासाठी देऊन दीड कोटी रुपयांची कमाई करणाऱ्या कंपनीला केवळ लाखांचच दंड का आकारण्यात आला? या दंडातून बालमनावर उमटलेले जातीय ओरखडे पुसले जातील का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. शिष्यवृत्ती परीक्षा जवळ आल्याने आता कंपनीचे काम काढून घेण्यात येणार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले.

# अशा लोकांशी युती शक्यच नाही
## नवनीत राणांचा संजय खोडकेंवर गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

भाजपच्या ज्येष्ठ नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे आमदार संजय खोडके यांच्यावर गंभीर आरोप करत थेट राजकीय युती नाकारली आहे. संजय खोडके हे चोर, गोळीबार करणारे व चाकूधारी गुन्हेगारांच्या पाठीशी उभे राहतात, असा आरोप करत अशा लोकांशी कोणताही राजकीय संबंध ठेवणे शक्य नसल्याचे राणा यांनी स्पष्ट केले.राणा व खोडके यांच्यातील राजकीय संघर्ष नवीन नसून, आगामी अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. अलिकडेच संजय खोडके यांनी भाजपने आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाशी युती केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपशी कोणत्याही परिस्थितीत युती करणार नाही,




असे विधान केले होते. त्यावर प्रत्युत्तर देताना नवनीत राणा म्हणाल्या की त्यांनाही संजय खोडकेंचा पाठिंबा नको आहे.खोडके धार्मिक चादर अर्पण करणाऱ्यांना आणि त्यातून आर्थिक लाभ मिळवणाऱ्यांना पाठिंबा देतात, तसेच गुन्हेगारांना संरक्षण देतात, असा आरोपही नवनीत राणा यांनी केला. अशा लोकांशी युती करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे त्या म्हणाल्या.राज्य पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) महायुतीत सहभागी असला, तरी अमरावतीत राणा व खोडके यांच्या भूमिकेमुळे स्थानिक पातळीवर महायुतीत फूट पडल्याचे चित्र आहे. काही दिवसांपूर्वी आमदार रवी राणा यांनी स्पष्ट केले होते की अमरावतीत भाजपची स्थानिक युती राष्ट्रवादी काँग्रेससोबत नसून युवा स्वाभिमान पक्षासोबतच असेल. या विधानानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते.त्यावर प्रत्युत्तर देताना संजय खोडके यांनी रवी राणा हे भाजपचे अधिकृत प्रवक्ते नसून त्यांनी पक्षाचे लाऊडस्पीकर बनण्याचा प्रयत्न करू नये, अशी टीका केली होती. तसेच लोकसभा निवडणुकीदरम्यान नवनीत राणा यांच्या प्रचारासाठी पोस्टरवर नाव व फोटो वापरण्यास खोडकेंनी परवानगी दिली नव्हती, तसेच अजित पवारांच्या रॅलीतही ते अनुपस्थित राहिले होते.या सर्व पार्श्वभूमीवर नवनीत राणा यांच्या ताज्या विधानानंतर अमरावती महानगरपालिका निवडणुकीत भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांच्यात युती होण्याची शक्यता जवळपास संपुष्टात आली असून, राणा दाम्पत्य आणि संजय खोडके यांच्यातील राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातर्फे ४४ व्या विदर्भ राज्यस्तरीय सीनियर महिला व पुरुष शूटिंग बॉल अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीउत्सवा निमित्त श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातर्फे ४४व्या विदर्भ राज्यस्तरीय सीनियर महिला व पुरुष शूटिंग बॉल अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावतीच्या क्रीडांगणावर करण्यात आले.

या स्पर्धेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. दिलीपबाबु भं. इंगोले यांच्या अध्यक्षतेत श्री. अनिल इंगळे जिल्हा क्रीडा अधिकारी अमरावती यांच्या हस्ते झाले. यावेळीप्रमुख अतिथी म्हणून शकीलोद्दिन काझी चला वर्धा सचिव, अमॅच्युअर शुटींगबॉल असोसिएन विदर्भ प्रदेश,मा. प्राचार्य डॉ. अंबादास कुलट



स्वीकृत सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती,प्रदीप शेट्टीये जिल्हा क्रीडा अधिकारी. वाशिम , डॉ .कुमार बोबडे जनसंपर्क अधिकारी , श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे सचिव आयोजन समिती विचारपिठावर उपस्थित होते.पाहुण्यांचे सन्मानचिन्ह शालश्रीफळ व फुलझाड देऊन स्वागत करण्यात आले.स्पर्धेच्या आयोजन समितीचे सचिव डॉ. सुभाष गावंडे यांनी प्रास्ताविक केले. या स्पर्धेमध्ये विदर्भातील ११ महिला व ११ पुरुष चम्मू सहभागी झाल्या आहेत.उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन महाविद्यालयाचे प्रा. जितेंद्र राऊत व आभार प्रदर्शन बबनराव आवारे सचिव, अमरावती शूटिंग बॉल असोसिएशन यांनी केले. यावेळी श्री संजय बढे कार्यकारी सदस्य अमॅच्युअर शुटींगबॉल असोशिएन अमरावती तसेच अमॅच्युअर शुटींगबॉल असोशिएन चे सर्व पदाधिकारी व श्री शिवाजी शारीरिक महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# दहेगाव धरणाच्या पाणी लढा यशस्वी
## शिरजगाव मोझरी, धोत्रा, अनकवाडी, मालधूर येथील शेतकऱ्यांना मिळणार पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६तिवसा**

शेतकऱ्यांना रब्बी हंगामाच्या पिक पेरणीसाठी नोव्हेंबर मध्येच धरणाचे पाणी मिळणे अनिवार्य होते. मात्र, मृद्‌जलसंधारण विभागाने तब्बल एक महिना फक्त धरणाच्या कॅनल दुरुस्तीतच घातल्याने अखेर शेतकऱ्यांची पेरणी लांबणीवर पडली होती. परिणामी यासंदर्भात शिरजगाव मोझरी, धोत्रा, अनकवाडी, मालधूर येथील शेतकऱ्यांच्याना तातडीने कॅनल बंधाऱ्याची दुरुस्तीचे कामे पूर्ण करून पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी सोडण्याच्या मागणीसाठी दहेगाव धरणात जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान मृद्‌जलसंधारण विभागाने शुक्रवारी ११ वाजताच प्रशांत कांबळे आणि धोत्रा ग्रामपंचायत सरपंच भूषण गाठे यांच्या उपस्थितीत पाणी सोडण्यात आले.

गेल्या एक महिन्यांपासून दहेगाव धरणाच्या पाण्यासाठी शिरजगाव, धोत्रा, अनकवाडी आणि मालधुरच्या शेतकऱ्यांची प्रतिक्षा होती. त्यानंतर यासंदर्भात शिरजगाव येथील शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्याकडे आपली समस्या मांडली. त्यावरून सलग तीन दिवस मृद्‌जलसंधारन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क आणि तक्रारी केल्यानंतर कार्यकारी अभियंता निकिता देशमुख यांनी बुधवारी दहेगाव धरणाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी सुद्धा केली होती.



त्यानंतरही कॅनलच्या बंधाऱ्यांची कामे अपूर्ण असल्याने आणि संबंधित ठेकेदाराकडे मजूर कमी असल्याने पाणी सोडण्यास उशीर होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. मात्र, प्रशांत कांबळे यांनी संबंधित शेतकऱ्यांसोबत धरणात जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर मृद्‌जलसंधारण विभागाने दुरुस्तीच्या कामाचा वेग वाढवला. शिवाय, कंत्राटदाराला सुद्धा प्रशासनाने तंबी दिली. परिणामी शुक्रवारी सकाळी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे, धोत्रा ग्रामपंचायत सरपंच भूषण गाठे, शिरजगाव ग्रामपंचायत सदस्य पुरुषोत्तम मेश्राम, हर्षल मेश्राम, जयंत तायवाडे, निमचंद कोचर, प्रमोद जाधव, अमोल बद्रे, जीवन गजभे, सदानंद भालेराव आदी शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# हनुमान गढी परिसरात पॅरामोटरींगची ट्रायलला सुरुवात; ५ जानेवारीपासून नियमित उड्डाणे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

अमरावती शहराच्या पर्यटन विकासाला नवी दिशा देणाऱ्या पॅरामोटरींग उपक्रमाची सुरुवात येथील प्रसिद्ध हनुमान गढी परिसरात ट्रायल बेसवर करण्यात आली आहे. या साहसी उपक्रमाला पर्यटकांसह स्थानिक नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, येत्या ५ जानेवारीपासून पॅरामोटरींग नियमित स्वरूपात सुरू होणार आहे.या उपक्रमामुळे अमरावतीकरांना आकाशातून शहराचे विहंगम दृश्य पाहण्याचा थरारक व रोमांचक अनुभव घेता येणार आहे.



हनुमान गढी परिसरातील नैसर्गिक सौंदर्य, टेकड्या आणि शहराचे विस्तीर्ण दर्शन पॅरामोटरींगच्या माध्यमातून अनुभवता येणार असल्याने अमरावतीचे पर्यटन नकाशावर वेगळे स्थान निर्माण होण्याची शक्यता आहे.आमदार रवि राणा यांच्या पुढाकारातून हा उपक्रम अमरावतीत साकार होत आहे. यासंदर्भात त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, अमरावती शहरात पर्यटन आणि साहसी खेळांसाठी मोठी क्षमता आहे. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि शहरात पर्यटकांची संख्या वाढावी, या उद्देशाने पॅरामोटरींगसारखा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.ट्रायल दरम्यान अनुभवी व प्रशिक्षित पायलट आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या देखरेखीखाली सर्व उड्डाणे घेण्यात आली. सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक तांत्रिक सुविधा, हेल्मेट, सेफ्टी हार्नेस तसेच अन्य संरक्षक साधनांचा वापर करण्यात आला असून, पुढील काळातही सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे.हनुमान गढी परिसरात सुरू झालेल्या या उपक्रमामुळे स्थानिक व्यावसायिक, हॉटेल उद्योग तसेच पर्यटनाशी संबंधित सेवांना चालना मिळणार आहे. साहसप्रेमी युवकांबरोबरच बाहेरील पर्यटकांमध्येही या उपक्रमाबाबत उत्सुकता निर्माण झाली असून, अमरावतीकरांना आता पॅरामोटरींगच्या माध्यमातून आकाशात झेप घेण्याचा अनोखा अनुभव घेता येणार आहे.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत